मुंबई संप.... जॉर्ज फर्नांडिस....

# माणूस

२६ ऑगस्ट ७४ किंम

पन्नास पैसे



माणूस
शनिवार
२६ ऑगस्ट १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : तेरा

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशाची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

**१९ ऑगस्ट, ७२**

◻ 'माणूस' चा विशेषांक वाचला. आराकान, भागोजी नाईक अत्यंत वेधक व हृदयस्पर्शी उतरले आहेत. मुलाखतींची भट्टी मात्र म्हणावी तशी साधली नाही. अंकाच्या प्रती खूप कमी काढल्या का ? कारण मुंबईला बरेच विक्रेते १ रु. ऐवजी १।. रु. मागत होते. नेहमीच्या ग्राहकांनासुद्धा. हा माझा स्वतःचा अनुभव.

**केशव मेश्राम, मुंबई**

**१७ ऑगस्ट, ७२**

◻ आपला स्वातंत्र्यदिन विशेषांक वाचला. रवींद्र पिंगे यांचा 'मंगलधाम' लेख वाचला. त्यात जॅक्सन खून खटल्यातील मुख्य आरोपी हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांच्या गावाचे नावाचा 'इम्माताऊ' असा उल्लेख आहे. परंतु हुतात्मा कान्हेरे यांचे मूळ गाव आयनी, ता. खेड, जि. रत्नागिरी असे आहे. हुतात्मा कान्हेरे यांचे बंधू कै. शंकर लक्ष्मण कान्हेरे यांचे वास्तव्य आमच्या लवेल गावी (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथेच होते. कै. शंकर लक्ष्मण कान्हेरे यांच्या तोंडून आम्ही हुतात्मा कान्हेरे यांच्याबद्दलच्या अनेक हृद्य आठवणी ऐकल्या आहेत.

चुकीची माहिती लोकांना होऊ नये म्हणूनच केवळ हे लिहिले आहे.

**शरद जोशी, मुंबई**

## मुंबई वार्ता

# साडेसत्याण्णव हजार लोकांचा संप

**प्रतिनिधी**

मुंबईतील ९० हजार महापालिका कर्मचारी आणि सुमारे साडेसात हजार बेस्टचे कर्मचारी संपावर आहेत. त्याच बरोबर महाराष्ट्रभर एस्. टी. चे कामगारही संपावर आहेत. बऱ्याचशा कामगारांची संपाबाबत धरपकडही झाली आहे. एस. टी. कामगारांच्या धरपकडीचे प्रमाण तर प्रत्येक १० पैकी १ जण तुरुंगात आहे असे आहे. बेस्टच्या आणि महापालिकेच्याही बऱ्याच कर्मचाऱ्यांना अटक झाली आहे. एस. टी. कर्मचाऱ्यांच्या संपाच्या यशाबद्दल विशेष बोलण्यासारखे नाही पण पालिकेचे आणि बेस्टचे कर्मचारी आजतागायत तरी निर्धाराने लढा देत आहेत. या तिन्ही संपांची कारणे वेगवेगळी असली तरी यात दूरगामी परिणाम घडविणारे कारण बोनस हे आहे.

एस. टी. च्या मागण्या : ड्रायव्हरला योग्य वेतन, कंडक्टरला नोकरीची शाश्वती, घरांची सोय किंवा घरभाडे वगैरे आहेत. तर बेस्टच्या इंजिनियरिंग खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या संपाचे कारण सध्याचे केंद्रीय कायदा मंत्री श्री. ह. रा. गोखले यांच्या निवाड्याच्या तत्त्वाची अंमलबजावणी व्हावी हे आहे. गोखले निवाड्यानुसार कारकुनांची वेतनश्रेणी वाढविल्यावर त्यांच्या पातळीवर इंजिनियरिंग कामगारांची वेतनश्रेणी वाढणे क्रमप्राप्त होते पण बेस्टच्या संचालकांनी याकडे पुरेसे लक्ष दिले नाही.

बेस्टच्या कारकुनांची वेतनश्रेणी ७५–२७५ वरून ९०–५०० पर्यंत गेली म्हणूनच ४०–८० वेतनश्रेणी असणाऱ्या इंजिनियरींग कामगारांची मागणी ती

५०–१५० व्हावी अशी आहे. या मागणीसाठी ते संपावर गेल्याने बसेसची दुरुस्ती करणे वा निगा राखणे कठीण झाले आणि परिणामी बऱ्याच कमी बसेस रस्त्यावर धावू लागल्या म्हणून महापालिकेने एस. टी.च्या बसेस रस्त्यावर आणल्या. त्याचा निषेध म्हणून प्रथम नियमानुसार काम आणि नंतर बेस्टचे ड्रायव्हर्स व कंडक्टर्सही संपावर गेले.

महापालिकेचे ९० हजार कर्मचारी संपावर आहेत त्याचे कारण अगदी वेगळे पण फारच महत्त्वाचे आणि दूरगामी आहे. केंद्रीय मजूरमंत्री खाडिलकर यांनी सध्या आठ टक्के बोनसची घोषणा केली.

महापालिका कर्मचाऱ्यांना बोनस मिळावा म्हणून २१ जूनला पालिकेच्या बैठकीत तसा ठराव एकमताने मंजूर झाला. याचे परिणाम काय व किती दूरगामी होतील याचा विचार कोणीही केला नाही. नवकाँग्रेसच्या नगरपित्यात तर अति उत्साह संचारला होता.

गरिबी हटावोच्या कार्यक्रमात आपण मागे नाही हे दाखवून देण्याची त्यांची कोण धडपड चालू होती. बी. पी. सी. सी चे (नवकाँग्रेसचे) उपाध्यक्ष श्री. गोरिवाला यांनी तर ब्रिटनच्या डेप्युटी हायकमिशनरच्या स्वागत-समारंभात मोठ्या अभिमानाने सांगितले की, पहा आम्ही किती प्रागतिक आहोत ते. आम्ही महापालिका कर्मचाऱ्यांनाही बोनस देतो. रजनी पटेल, अॅ. मेंगदे यांचीही हीच अवस्था होती आणि आता ही सारी मंडळी स्वत:च मंजूर केलेल्या ठरावाविरुद्ध उभी ठाकली आहेत. मग या लोकांना संप राजकीय आहे, स्टंटबाजी आहे हे म्हणायाचा त्यांना काय अधिकार आहे. याच्या गंभीर परिणामाची व्याप्ती लक्षात येताच इंदिराबाईंनी रघुनाथरावांना व बी. पी. सी. सी. वाल्यांना चापले. त्याबरोबर खाडिलकरांनी ही योजना सर्वांना नसून उद्योगधंदे व व्यापारी व्यवसायापुरतीच मर्यादित असल्याचे सांगितले. तर बी. पी. सी. सी. वाल्यांची फारच पंचाईत झाली. ठरावाची अंमलबजावणी न करावी तर पत जाते. ठराव करण्याचे प्रयत्न करावेत तर गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागते. या कात्रीत ते सापडले आहेत. या साऱ्या खेळात संपावरील कर्मचारी आणि जनता मात्र हाल सोसते आहे.

महापालिका शिक्षकांच्या संपाचे नेते नवकाँग्रेसचे श्री. का. श. धारिया आणि आमदार गजानन लोके यांची तर त्रिशंकूसारखी अवस्था झाली आहे. संपात ते अगदी फरफटत चालले आहेत. श्री. मनोहर कोतवालांचीही परिस्थिती जवळपास तशीच आहे. प्र. स. पक्षातून काँग्रेसमध्ये जाताना त्यांनी आपल्या राजकारणाचा परिणाम ट्रेड युनियनवर होणार नसल्याची आणि पक्षाचा विचार न करता कामगार लढ्यात कामगारांशीच एकनिष्ठ रहाण्याची शपथ घेतली होती. त्यामुळे त्यांची स्थितीही विचित्र आहे. संपाबद्दल बरंच लिहिलं गेलं असल्यामुळे जास्त काही न लिहिता हा सर्वसाधारण आढावा घेतला. संप सध्या संपेल अशा अवस्थेत

नाही. एकूण सारीच कोंडी झाली आहे. दिल्ली आणि मुंबईतील सत्तारूढ पक्ष मजा बघतो आहे. एकूण हालचाली अगदी किरकोळ आहेत.

◻

# हिंदुस्थानात सर्वांना बोनस मिळालाच पाहिजे–

## –जॉर्ज



जॉर्जची मुलाखत घेणे हे काम सोपं नाही. तासन् तास त्यांची वाट पहाण्याइतकी सहनशीलता त्यासाठी अंगी असणे आवश्यक असते. कामाचा प्रचंड बोजा, त्यातच येणारे फोन्स आणि भेटायला येणाऱ्या माणसांची वर्दळ, सभा, खलबते यातच जॉर्ज गुरफटून गेलेले असतात. जेवणाचीही मग फिकीर नसते. बहुतेक रोजच कॉफी पिऊन वा केळी खाऊन दिवस काढावा लागतो. सतत तीन दिवस सावलीसारखा जॉर्जच्या मागे राहिलो तेव्हा कुठे आज घाईघाईत मुलाखत मिळाली.

प्रश्न : जॉर्ज, या संपाचा निर्णय दिल्लीत होणार की मुंबईत ?

उत्तर : अंतिम निर्णय मुंबईतच होणार, पण दिल्लीतून इंदिराबाईंनी आदेश दिल्याशिवाय, राज्य सरकार किंवा महापालिका काही हालचाल करायला तयार नाही असे दिसते. ही काय लोकशाही आहे ? गल्लीतील झाडूवाल्याच्या संपातही दिल्लीतून बाईंचा आदेश. राज्य सरकार, महापालिकेला, यांना काही अधिकारच नाहीत का ? साऱ्या गोष्टीत एका व्यक्तीची हुकुमत, हे काय चालले आहे ?

प्रश्न : 'तीन चार दिवस झाले आता संप मागे घ्या. संपाला बरीच प्रसिद्धी मिळाली, आणि तसे केले नाही तर संप चिरडून टाकू' असा खाडिलकरांचा दिल्लीहून फोन आला होता हे खरं आहे का ?

उत्तर : हे खरे नाही, पण 'सिंबॉलिक निषेध' करून झाला आहे. आता तरी संप मागे घ्या असे मात्र त्यांनी सांगितले.

प्रश्न : या संपामुळे तुम्ही जनतेला ' वेठीस धरले ' आहे असे अनेक लोकांना वाटते तेव्हा यामुळे तुम्ही जनतेची सहानभूती गमवत आहात असे नाही का वाटत ?

उत्तर : मला असे वाटत नाही. बहुतेक वर्तमानपत्रांनी आम्हाला पाठिंवा दिला आहे. काही लोकांचा विरोध जरूर आहे पण या संपातील मूलभूत प्रश्न काय आहेत ? हे ज्यांना कळले आहे त्यांचा जरूर पाठिंबा आहे आणि असे लोक फार मोठ्या प्रमाणात आहेत. ज्यांना हेच कळले नाही त्यांचा विरोध, होणाऱ्या त्रासापाई होत आहे. परिणामापेक्षा, प्रश्नांचा विचार करून लोकांनी याचे मूल्यमापन करावे. समजा भाववाढी विरुद्ध मोर्चा काढल्यामुळे वाहतुकीत व्यत्यय आल्यास घरी जायला उशीर झाला या कारणासाठी कुरबुर व्हावी की भाववाढीसारख्या ज्वलंत प्रश्नावर मोर्चा आला आहे म्हणून सहानुभूती वाढावी या सारखाच हा प्रश्न आहे.

प्रश्न : या संपाला खऱ्या अर्थाने केंद्रीय मजूर मंत्री रघुनाथराव खाडिलकर जबाबदार आहेत असे वाटते का ?

उत्तर : या संपाची सर्व जबाबदारी मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटी (नवकाँग्रेस) व राज्य सरकारवर आहे. यांच्या आडमुठेपणामुळे संप झाला. खाडिलकरांनी बोनसाबाबत जे सांगितले ते चांगले सांगितले. पण मुंबई महानगरपालिकेत ज्यांनी ठराव केला त्यांनीच राजकारण आणून त्याला विरोध केला. यामुळेच संपाची व त्याच्या परिणामाची सर्व जबाबदारी बी. पी. सी. सी. (नवकाँग्रेस) व राज्यसरकारवर आहे.

प्रश्न : उत्पादनाला मदत न करणाऱ्या युनिट्सना का बरे बोनस द्यावा ?

उत्तर : बोनस आणि उत्पादनाचा संबंध मी मानत नाही. उत्पादनाशी प्रत्यक्ष संबधीत असलेल्या कामगाराला बोनस मिळावा पण अप्रत्यक्षरित्या त्या उत्पादनाला मदत करणाऱ्या त्याच कारखान्यातील कारकुनाला बोनस नको असे म्हणण्यासारखे आहे. तीच परिस्थिती महापालिका कर्मचाऱ्याबाबतही खरी आहे. नफा झाला तरच बोनस मिळावा यालाही काही अर्थ नाही. नफा मिळो वा न मिळो बोनस कायद्यानुसार ४ टक्के बोनस हा मिळालाच पाहिजे अशी तरतूद आहे.

प्रश्न : जॉर्ज, हे सारं ठीक आहे, पण मुंबईमागोमाग दिल्ली, कलकत्ता महापालिकाच नव्हे तर ठाणे कल्याण पालिका आणि ग्रामपंचायतीसुद्धा बोनस मागतील त्याचे काय ? एवढी आर्थिक कुवत आज या देशात आहे का ?

उत्तर : देशातील केंद्रीय व राज्य सरकारी कर्मचारी, निमसरकारी आणि बिनसरकारी कर्मचारी वगैरे साऱ्यांनाच बोनस मिळाला पाहिजे. हा त्यांचा हक्क आहे. १२ महिने काम केलेल्याला १ महिन्याचा बोनस ' डिफरड् वेज 'च्या रूपाने मिळालाच पाहिजे, हे तत्त्व मानले तर देशातील १ कोटी कामगारांना २०० कोटी रुपये लागतील. यात पोलिसच नव्हे तर सेनादलाचे लोकही येतात. याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होईल असे वाटत नाही.

प्रश्न : पालिका कर्मचारी हे जनतेचे सेवक आहेत असे म्हटलं तर मग या प्रश्नाबाबत प्रत्यक्ष जनतेलाच आवाहन करून जनतेचाच कौल का मागत नाही ?

उत्तर : आम्ही राजकीय पक्ष आणि कामगार संघटनांना आवाहन केलेले आहे. त्या सर्व संघटना जनतेच्याच संघटना नाहीत का ? या सर्वांचा आम्हाला पाठिंबा आहे. म्हणजे जनतेचाच या संपाला पाठिंबा आहे.

प्रश्न : या संपाचे बरेचसे परिणाम दूरगामी होणार आहेत, ते राजकीय आहेत, आर्थिक आहेत, ट्रेड युनियनबाबतचे आहेत आणि इतर अनेक बाबतीत ते होणार आहेत. तेव्हा असे कोणकोणते परिणाम होतील असं वाटतं ?

उत्तर : 'प्रोग्रेसिव्ह' घोषणा देऊन त्यांची अंमलबजावणी न करणाऱ्यांचे खरे स्वरूप पुढे यायला यामुळे मदत होणार आहे. हा निव्वळ पोकळ दिखावूपणा होता हे लोकांना समजेल. लढ्याशिवाय वा त्यागाशिवाय सामान्य माणसांच्या प्रश्नांचा निकाल लागत नाही हे लोकांपुढं येऊन लोकांची शक्ती निर्माण होऊन अशा सवंग घोषणाबाजीच्या राजकारणाला आळा बसेल–आर्थिक बाबतीत असे म्हणता येईल

---

## एकूण असा जातो जॉर्जचा दिवस !

सकाळी सकाळीच फोन खणखणतो आणि जॉर्ज जागा होतो. त्यामागोमाग मग सारखे फोन येतच असतात अथवा जॉर्ज फोन करीत असतो. दिल्लीत खासदार मधू दंडवते किंवा मजूर मंत्री र. के. खाडिलकर किंवा खासदार आबासाहेब कुलकर्णी वगैरेंशी फोनवर बोलणी करायची असतात. त्यांचेही फोन्स येत असतात. (या फोनाफोनीत सौ. लैला फर्नांडिस यांचा फोन येतो का ? की मेमसावना जॉर्जसाब फोन करतात हे गुपित कळू शकले नाही. कदाचित त्यांची संभाषणे रात्री जॉर्ज घरी गेल्यावर होत असावीत.)

सकाळी ७ च्या सुमारास नरेंद्रसिंग येतो. जॉर्जला कॉफी करून देणे व इतर व्यवस्था पहाणे हे त्याचे काम. फोन करीत असतानाच वर्तमानपत्रे पहाणे वगैरे चालूच असते. आठ नंतर इतर लोक किंवा जॉर्जचे सहकारी भेटायला येतात. जॉर्जचे फोनवर संभाषण ऐकणे मजेशीर असते. दुसऱ्या बाजूला कोण असेल यावर हे सारे अवलंबून असते. 'संप केव्हा संपणार'ची कुरकुर करणाऱ्या कोणाला तरी 'तुम्ही ते रजनी पटेलना विचारा' असे उत्तर दिले जाते.

मग दाढी, आंघोळ आणि नास्ता होईपर्यंत दहा साडेदहा वाजतात. यानंतर स्वारी कामासाठी बाहेर पडते. कामाच्या मागे लागल्यावर तो तहानभूक विसरतो. मध्येच लहर आली तर एक-दोन कप कॉफी घेतो.

की आर्थिक धोरणात ज्या काही चुका आहेत त्या समजून घेण्याचा प्रयत्न होऊन त्याला योग्य वळण लागले तर तो एक फायदाच ठरेल.

प्रश्न : जॉर्ज, तुम्ही संपाचे नेते आहात तसेच करदातेही आहात. करदाते म्हणून संपाबद्दल तुम्हाला काय वाटते ?

उत्तर : मी संपाच्या कारणांकडे पहातो परिणामांकडे नाही. येथे न्याय अन्यायाचा प्रश्न आहे. समाजासाठी अधिक कर देण्याची माझी जरूर तयारी आहे पण येथे कर वाढविण्याचा प्रश्नच येत नाही. महापालिका आयुक्त म्हणाले होते की, करवाढ न करता हा बोनस देता येईल.

प्रश्न : बोनस म्हणून मिळणारा बराचसा पैसा दारू, सट्टा वगैरेसारख्या वाईट मार्गाकडे जाणार आहे तेव्हा तसा तो जाऊ न देता त्याचा उपयोग वेलफेअरसाठी होऊ नये काय ?

उत्तर : जिथे लोकांना जीवन वेतन मिळत नाही तेथे त्यांनी तो पैसा कसा खर्च करावा याची चर्चा करण्यात मतलब नाही. ◻

## ...बोलणी, भेटीगाठी, फोन्स्, भाष...णं

ऑफिसात आल्यावर मनिला काढून बनियनवर बसणे जॉर्जला फर्मासपैकी आवडते. कामगारांचे प्रश्न, संपाच्या अवस्थेची चौकशी, बोलणी, भेटीगाठी, फोन्स, पत्रांचे मसुदे तयार करणे ही कामे तिथे होतात. मग काळा घोडा येथे एखाद्या मोर्चापुढे बोलायचे असते. फक्त दहा मिनिटे बोलणार असं सांगणारा जॉर्ज अर्धा तासाचे तरी भाषण ठोकतो. जाता येता जॉर्ज फर्नांडिस झिंदाबादचा घोष चालू असतो. आता तीन साडेतीन वाजून गेलेले असतात. भूक लागली आहे हे लक्षात आले तर वळवायचा मोर्चा एखाद्या उपहारगृहात. मग पुन्हा सभा, भाषणे, वाटाघाटी, डावपेचांचे सत्र सुरू होते ते अगदी रात्रीपर्यंत. काम असेल तर मग ऑफिसाला जायचे. तिथेच केळी, बिस्कटे, कॉफी घ्यायची. बस्स, हा त्याचा रात्रीचा आहार. एवढे सारे काम केल्यामुळे पूर्वी केव्हातरी निदर्शनात खाल्लेल्या लाठ्यांमुळे शारीरिक-रीत्या जॉर्ज दमलेला असतो. पण तरीही चिअरफूल. डॉक्टरांनीही प्रकृतीची काळजी घे म्हणून सांगितलेले असते. पण त्याची दखल घेईल तर जॉर्ज कसला ? रात्री केव्हातरी बारानंतर घरी जायचे. पुन्हा काही फोन्स नाहीतर मग टेपरेकॉर्डेड संगीत ऐकत मध्यरात्र उलटून गेली तरी वाचन करायचे हा झोपेपर्यंतचा कार्यक्रम. वाचनाला कोणताही विषय चालतो. अगदी सार्त्रही चालतो. सकाळी फोनकॉल असतोच साखरझोपेतून उठवायला !

## मुक्काम पुणे

# रौप्यमहोत्सवाचा सोहळा !

**मुकुंद मणूरकर**

१४ ऑगस्ट १९७२. सहस्त्ररश्मीने दडी घेतली आणि पुण्यनगरी लक्षलक्ष दिपांनी उजळली. स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवाचा क्षण नजीक येत होता ! पण या मंगलप्रसंगावर सावट पडले होते भीषण दुष्काळाचे व जीवघेण्या महागाईचे. शिवाय भरीला कुठे कुठे चाललेले संप, आंदोलने वगैरे होतेच. पण या सर्वांवर मात केली निखळ देशाभिमानाने ! पाकिस्तान बरोबरच्या युद्धात मिळालेल्या विजयाने प्रत्येक भारतीयाच्या अंत:करणात राष्ट्रवाद नव्याने ओसंडत होता. त्यामुळेच इतर सर्व अडचणी विसरून सामन्य माणूस या मंगलक्षणाचे स्वागत करण्यास सिद्ध होता. सरकारी, निमसरकारी कचेऱ्या, बँका व इतर अनेक इमारतीवर नयनवेधक विद्युत् रोषणाई करण्यात आली होती. ही रोषणाई बघण्यास आबालवृद्ध स्त्री-पुरुष, युवक-युवती यांनी रस्त्यावर एकच गर्दी केली होती. दोन दिवस पुण्याला गणेशोत्सवासारखे स्वरूप आले. 'सामान्य माणसाने काय मिळविले ?' 'सामान्य माणसाची २५ वर्षांतील वाटचाल' अशा तऱ्हेच्या लेखात वर्णन केलेला सामान्य माणूस मात्र, काही क्षणांपुरता का होईना – पण दिसत नव्हता.

या उत्सवाचा विशेष म्हणजे रात्री पुण्यात विद्यार्थ्यांनी काढलेल्या मशालमिरवणुका ! एक मिरवणूक पुणे विद्यापीठातर्फे निघाली होती. कुलगुरूंनी या मिरवणुकीचे नेतृत्व केले होते. दुसरी मिरवणूक युवक काँग्रेसने काढली तर तिसरी आणि भव्य स्वरूपात निघालेली मशालमिरवणूक अ. भा. विद्यार्थी परिषदेने आयोजित केली होती. प्रथमदर्शनी चौघडा, मागे ढोल-लेझिमचा ताफा, त्याच्यामागे असंख्य विद्यार्थी घोषणांचे नारे देत नाचत, बागडत चालले होते. शेवटी एका ट्रकवर विजयस्तंभ उभारला होता. ट्रकवर क्रांतीकारक व नेते यांची चित्रे लावली

**पृष्ठ ५८ वर**

# वाङ्मयशोभा

## चारशेवा अंक

**वि. भा. देशपांडे**

'वाङ्मयशोभा' मासिकाचा चारशेवा अंक हाती आला. त्यातल्या दोन गोष्टींनी लक्ष वेधले. एकतर संपादकांनी केलेले 'थोडेसे सिंहावलोकन थोडेसे संस्मरण' आणि दुसरे म्हणजे मृणालिनी देसाई यांची एक कादंबरी !

श्री. म. म. केळकर हे नाव मराठी मासिक सृष्टीत दीर्घ परिचयाचे आहे. किती बिकट परिस्थितीत त्यांनी मासिक सुरू केले, त्यावेळची परिस्थिती कशी होती, अनुभव कोणते आले, याचे सिंहावलोकन त्यांनी केले आहे. विशेषत: तीस-पस्तीस वर्षे एखादे मासिक विशिष्ट ध्येयाने-नेटाने चालवायचे, ही अवघड गोष्ट आहे. केवळ चालवायचे असे नाही तर जनमानसात त्याची प्रतिमा तयार करायची, हे त्याहून अवघड आहे. ते अवघड कार्य केळकरांनी एकलव्याच्या निर्धाराने केले. साथीला, सल्ल्याला, मदतीला केळकर कुटुंबियांपैकी तात्यासाहेब, गिरिजाबाईसारखे थोर साहित्यिक होते. कमलाबाई देशपांडे यांच्या सारखी खंबीर स्त्री धीर द्यायला होती. या साऱ्यातून म. म. नी जर काही महत्वाचे कार्य केले असेल, तर काही ललित लेखकांबरोबरच विचारप्रवण लेखकांच्या साहित्याचा लाभ मराठी वाचकाला करून दिला. अलिकडच्या काही वर्षातील महत्त्वाचा एक उल्लेख करावासा वाटतो, तो प्रा. द. के. केळकर यांच्या ग्रंथांचा ! त्यांच्या ग्रंथांचे प्रकाशन करून एक प्रकारे मराठी साहित्याची अमोल सेवाच त्यांनी केली आहे.

या अंकात सौ. मृणालिनी देसाई यांची 'योगिनी' नावाची कादंबरी आहे. मीराबाईच्या जीवनावरची ! अतिशय छोटी अशी ही कादंबरी किंवा 'कादंबरीका' असेही म्हणता येईल. संत मीराबाईच्या जीवनावरील ही कादंबरी असल्याने विशेष औत्सुक्याने वाचली. पण पूर्णत: निराशा झाली. वास्तविक मृणालिनी देसायांचे नाव मराठी कथा-कादंबरीत मान्यवर झालेले आहे. त्यांच्या

नव्या लेखनातून काही अपेक्षा कराव्यात, अशी परिस्थिती आहे. पण या कादंबरीत मात्र अपेक्षाभग झाला. त्याचे कारण मला वाटते, मीरेचे जीवन चरित्र प्रसंगरूपाने निवेदित करणे एवढेच या कादंबरीने साधले आहे. घटना-प्रसंगांच्या पलिकडे जाऊन मीरेच्या जीवनाचा अंतर्शोध त्या घेऊ शकल्या नाहीत. मीरेचे जीवन हे घटनाप्रधान नाही. तर ते जीवा-शिवाच्या भेटीचे आर्त आक्रंदन आहे. ते एक पैलतीराचे गाणे आहे. एका आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या पातळीवरचे गहनगूढ असे रूप आहे. ते गूढ, ते आक्रंदन व्यक्त करण्यासाठी लेखिकेने मीरेच्या जीवनातील चरित्र घटनांचा वापर अगदी वरवरच्या स्तरावर केला. त्यातल्या अंतरंगाचा शोध घेण्याचा यत्न केला नाही. परिणामी ही कादंबरी म्हणजे मीराबाईच्या जीवनातील प्रसंगांची मालिका असलेले चरित्रलेखन झाले. वाईट एवढ्यासाठीच वाटले, की मीरेच्या जीवनावर चांगली कलाकृती होण्याचा योग हुकला. आणि मृणालिनी-बाईंच्या साहित्य श्रेयमालिकेत पर्यायाने मराठी साहित्यात एका सामान्य कादं-बरीची भर पडली.

म. म. केळकरांनी संपादकीयात आपले मनोगत स्पष्ट करताना एक विचार मांडला आहे, की मराठी मासिकाचा खप मोठ्या प्रमाणात का वाढत नाही. त्यासाठी त्यांनी तमिळी, तेलगु, हिंदी मासिकांची-पाक्षिकांची नावे उदाहरणा-दाखल दिली आहेत. मराठी माणूस एकूण वाङ्मय किती वाचतो हे आकडेवारीने सांगणे व्यर्थ आहे. पण तो मासिके किती आणि कोणती वाचतो, याबद्दल स्थूल-मानाने सांगणे शक्य आहे. मासिक काय आणि इतर ललित वाङ्मयीन पुस्तक काय ते विकत घेऊन वाचण्याचा गुणधर्म आपल्यात कमीच. हे कडवट असूनही सत्य आहे. वाचक मासिक विकत घेत नाही म्हणून मासिकाचा खप मर्यादित आहे, तो तसाच राहणार असे म्हणता येईल. जरी मराठी वाचक विकत घेऊन वाचण्याचा प्रवृत्तीचा कमी असला, तरी एकूण वाचण्याची त्याची वृत्ती कमी नाही. दिवसें-दिवस ती वाढतच आहे. मासिके विकत घेणे शक्य नाही म्हणून छोट्या छोट्या ग्रंथालयातून–वाचनालयातून तो मासिके आणतो, वाचतो.

पण पुन्हा एक प्रश्न राहतोच, की आवर्जून विकत घ्यावीत अशी मराठीत मासिके किती? तर बोटावर मोजण्याइतकीसुद्धा नाहीत. मासिकांच्या निर्मितीचा व्याप संख्येने खूपच वाढला आहे. आणि जेव्हा एखाद्या गोष्टीची संख्यात्मक वाढ होते तेव्हा तिच्या गुणात्मकतेचाही विचार अपरिहार्यपणे येतो. बहुधा संख्यात्मक आणि गुणात्मक गोष्टींचे नाते व्यस्त राहते. निदान मराठी मासिकांबद्दल तरी आज ती परिस्थिती आहे. किर्लोस्कर स्त्रीचा वाचक वाढला आहे. कालमानानुसार त्यांनी आपल्या मासिकांमध्ये बदलही केले. सत्यकथा, ललित, युगवाणी, प्रतिष्ठान, आलोचना म. साहित्य पत्रिका इ. अशा प्रकारच्या मासिकांचा त्यात द्वैमासिक-त्रैमासिकेही येतात) वाङ्मयप्रेमी-वाङ्मय चिकित्सक वाचक वेगळा आहे. त्याची

संख्या एका विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक वाढणारही नाही. त्यानंतरचा वाचक असतो वसंत, वसुधा, वाङ्मयशोभा, हंस, धरती वगैरे मासिकांचा. खरा प्रश्न आहे तो उदंड पिकत असलेल्या विनोदी स्वरूपाच्या, महिलांविषयीच्या, शृंगार-प्रणय-प्रधानपर मासिकांचा. या तिन्ही प्रकारच्या मासिकांचे अंतरंग साचेबंद झाले आहे. ते साचेबंद स्वरूप उबग आणणारे आहे. कोणतेही मासिक केव्हाही उघडायच्या आत आपण त्यामध्ये काय स्वरूपाच्या गोष्टी आणि मसाला आहे याची ग्वाही देऊ शकतो. तरीही त्या मासिकाला भरपूर वाचक आहे. कारण समाजामध्ये असा एक काहीसा सुखवस्तु आणि काहीसा गांजलेल्या परिस्थितीतून सुटका करू पहाणारा, रंजनाच्या शोधार्थ असलेला वाचकवर्ग आहे. पती ऑफिसला गेल्यावर प्रत्यक्ष ऑफिसमध्ये किंवा ऑफिसमधून घरी आल्यावर असलेल्या वेळाचे काय करायचे असा प्रश्न पडलेला हा वाचकवर्ग या साचेबंद, गुळगुळीत, उबवलेल्या साहित्यात स्वतःला सुखावण्याचा फसवा प्रयत्न करतो. त्याला महिना चार-दोन रुपये खर्चून हवी ती मासिके मोठ्या प्रमाणात मिळतात. मासिक विकत घेण्याच्या विचारापासून तो केव्हाच दूर गेलेला असतो. त्याची गरज भागलेली असते.

मराठी वाचक पैसे टाकून मासिक विकत घेत नाही हे जितके सत्य, तितकेच मराठी मासिकाचे संपादक (काही सन्मान्य अपवाद सोडल्यास) आपल्या मासिकाची कोंडी फोडीत नाहीत, हेही सत्य आहे. ठराविक पदार्थ, आलटून पालटून केशरचनांचे फोटो, वेचव विनोद-व्यंगचित्रे, सुमार कथालेखन ही कोंडी केव्हा फोडली जाणार? यातून ज्यांनी आपली निराळी वाट, निराळे ध्येय ठरवून वेगळेपण दाखवण्याचा प्रयत्न केला त्यातल्या सर्वांनाच उत्तम लेखक मिळत नाहीत. नावाजलेल्या लेखकांना देण्यासाठी त्यांच्यापाशी पैसा नाही. मग त्या मासिकांकडे चांगल्या वाचकाने कोणत्या कारणासाठी वळायचे? चांगले लेखक, उत्तम साहित्य, नवनवीन योजना-कल्पनांचा आविष्कार, आकर्षक छपाई यांच्या बळावर काही मासिकांनी मराठी वाचकांच्या मनात आदराचे–प्रेमाचे स्थान निर्माण केले आहे, हे विसरून चालणार नाही.

# एक
# प्रकाशन समारंभ
# खानदेशातला

**परिचित**

एक दृष्ट लागण्याजोगा अनोखा कार्यक्रम.

एरवी मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणांना परिचित असा पुस्तक-प्रकाशन समारंभ, तसा या खानदेशला तितकासा परिचित नाही. अमळनेर त्यात पुन्हा थोडे आड-वळणी; पण इथली सांस्कृतिक-पताका दोन्हो खानदेशांना कवेत घेऊन उंच उभी फडफडत आहे कितीतरी वर्षे.

तरीही बऱ्याच वर्षांनी येथल्या टिळक मंदिराला एवढी सांस्कृतिक गर्दी जमलेली नव्हती. ९ ऑगस्टच्या सायंकाळी मात्र टिळक मंदिर उत्साहानं क्षणोक्षणी ओसंडू लागलं.

सुरेख सजवलेलं व्यासपीठ. गुलाबी पार्श्वभूमीवर एका कोपऱ्यात ' चेतश्री प्रकाशना'चे बोधचिन्ह वाटावं अशी अक्षरं.. एका उडत्या तीक्ष्ण चोचीच्या पक्ष्याच्या पोटात कोरलेली. दुसऱ्या भागी 'प्रकाशन समारंभ...वि. वा. शिरवाडकर' अशी अक्षरे आणि मध्यभागी ठसठशीत पण नजाकती मुखपृष्ठाची प्रतिकृति टांगलेली. 'मरुद्‌गान' अक्षरे कुठूनही दिसतील अशी रचना.

वेळेच्या आतच टिळक मंदिर संपूर्ण गच्च भरले. मुख्य यजमान वा.रां.ची धांदल. स्वागतासाठी हात सिद्ध पण चेहऱ्यावर व्यवस्थेतल्या अडचणीची विवंचना. तोच मुख्य पाहुणे श्री. वि. वा. शिरवाडकर आले. सभेला एकदम चैतन्य आलं.

मवाळ वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष श्री. रावसाहेब नांदेडकर, डॉ. कमलाबाई म्हस्कर व श्री. डॉ. प्रभाकर म्हस्कर व आतापावेतो जमेल तशी 'स्वयंसेवकी' करण्यात मश्गुल असे 'मरुद्‌गान'चे लेखक व्यासपीठावर स्थानापन्न झाले. प्रा. कविमंडन यांनी सभेची सूत्रे हाती घेतली आणि नऊ ऑगस्टच्या क्रांतिदिनाचे एक स्मरण म्हणून श्री. कुसुमाग्रजांचीच 'गर्जाजयजयकार' या कवितेने क्षणात वर्षे




अध्यक्ष : कुसुमाग्रज । लेखक : वा. रा. सोनार

वर्षे मागे खेचून नेले. वातावरण वेगळ्या स्मृतींनी भारले गेले.

'मरुद्गान'च्या निमित्ताने स्थानिक व काही परिचित मंडळी शुभेच्छा प्रदर्शक बोलली. प्राचार्य पुरूषोत्तम पाटील, प्रा. कुडे, सौ. सुशीला पगारिया, प्रा. डॉ. एम्. बी. शहा, प्रा. मो. द. ब्रह्मे आदींनी श्री. वा. रा. सोनार, यांच्यासंबंधी काही अभिनंदनपर वक्तव्ये केली आणि पुस्तकाच्या अंतरंगाचाही पुसटसा परिचय काहींनी करून दिला.

यानंतर पुस्तक प्रकाशन श्री. कुसुमाग्रजांचे हस्ते झाल्यावर त्यांनी समयोचित भाषण केले. ते आपल्या व्याख्यानात म्हणाले,

"प्रकाशन समारंभ हा लेखकाच्या आयुष्यातील अत्यंत मोलाचा क्षण आहे. ते जर पुस्तक पहिलं असलं तर हा आनंद विशेषच. पुस्तक प्रकाशन हा केवळ पुस्तक

अनावरण समारंभ नसतो, तो एक जिवंत समारंभ असतो. लेखक आणि वाचक यांच्यात एक संबंध प्रस्थापित करणारा असा हा समारंभ असतो.

## बंदरातून बाहेर जाणारं गलबत

या समारंभानिमित्ताने माझ्या डोळ्यांसमोर नेहमी एक चित्र उभे राहाते, आणि ते म्हणजे, बंदरातून बाहेर पडणाऱ्या गलबताचे. हे गलबत बंदर सोडून बाहेर जात असतं. आणि दूरवरचा कोठलातरी किनारा त्याला गाठायचा असतो. रसिकांच्या संमतीचा किंवा पसंतीचा, प्रेमाचा किनारा हा रस्ता लांबचा असतो आणि खडतरही. काही ठिकाणी समुद्र शांत असतो, काही ठिकाणी प्रशांत, काही ठिकाणी स्नेहाचे दीपस्तंभ असतात तर, काही ठिकाणी अकारण द्वेषाचे खडकही समुद्रामध्ये जमलेले असतात. कुठे वारा असतो, कुठे वादळ. या सर्वांतून प्रवास करीत त्या गलबताला रसिकांच्या संमतीच्या, प्रेमाच्या किनाऱ्यापर्यंत पोचायचं असतं. आणि याबाबतीत बंदर काही करू शकत नाही. ते फक्त आपल्या दिव्यांचा प्रकाश जेथवर पाडता येईल तेथवर पाडीत असतं. त्या गलबताच्या प्रवासाकडे पहात असतं आणि आपल्या अंतःकरणातील सद्भावना त्यांना शुभास्ते पंथानः समजून, आशीर्वाद देऊन त्याठिकाणी प्रकट करीत असतं... या बंदराप्रमाणे आपण सर्व वा. रां. चे मित्र व चहाते अशी प्रार्थना करू या की त्यांच्या पुस्तकाचे हे जे सुंदर गलबत आहे, ते किनाऱ्यापर्यंत व्यवस्थित पोचेल. रसिकांच्या प्रेमाचा त्यास लाभ होईल."

श्री. वा. रा. सोनाराबद्दल बोलताना श्री. शिरवाडकर म्हणाले, "वा. रा. सोनार हे आपणा सर्वांना परिचित आहेत आणि खूपच चांगले परिचित असले पाहिजेत हे या गर्दीवरून वाटते. माझा त्यांचा जो परिचय आहे तो त्यांच्या लेखनद्वारा आणि शेवटी मला असं वाटतं की राजाला जसा सिंहासनावर पहावा तसा लेखकाला त्याच्या साहित्यामध्येच पहायला पाहिजे. साहित्यामध्ये भेटलेले वा. रा. सोनार हे अतिशय हृदयंगम अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व आहे, असं मला वाटतं. लेखकासंबंधी भलेबुरे प्रकार समजुती लोकामध्ये असतात. दरवाजे बंद करून कुठेतरी एकांतात बसलेला लेखक, जगाच्या व्यवहाराकडे काहीतरी तुच्छता बुद्धीने पहाणारा आणि स्वतःच्या अहंकारावरती अधिष्ठित झालेला असा एक प्राणी असतो. अर्थात कित्येकांच्या बाबतीत ते खरंही असेल. परंतु वारांचे जे व्यक्तिमत्त्व आहे, ते खरोखर भोवतालच्या जीवनाशी निगडित आहे. ते वाऱ्यांसारखे मनस्वी आहेत 'वारा' त्यांच्या नावातच आहे, पण वादळासारखे उन्मत्त नाहीत. मोडतोड करणारे नाहीत, 'वा. रा.'सारख्या लेखकांनी खूप लिहायला पाहिजे असं मला वाटते. 'वा रा.'-सारखे लेखक संगमरवरी मनोऱ्यात बसून लिहीत नसतात, पृथ्वीवरची धूळ ही आपल्या लेखनाला किंवा आपल्या प्रतिभेला लागली तर त्यांना खंत वाटत नाही, असे लेखक आहेत.

–टागोरांचे एक काव्य आहे लहानसं. टागोर म्हणतात, 'फूल फळाला विचारतं, की तू अजून किती दूर आहेस? तेव्हा फळ उत्तरतं, मी दूर नाही, मी तुझ्या अंतःकरणातच आहे. मी तुझ्यातच आहे.' साध्य आणि साधक प्रयत्न आणि त्याची सफलता यांच्यामध्ये अशा प्रकारचं अतूट नातं असावं अशा प्रकारचं थोर यश 'वा. रा.'ना लाभो ही शुभेच्छा"

'मराठी वाङ्मय मंडळाचे याचवेळी उद्घाटन झाले. व त्या संदर्भात बोलताना श्री. कुसुमाग्रज म्हणाले, "मला नेहमीच या खानदेश भागाचा हेवा वाटतो तो भौगोलिक परिस्थितीसाठी नव्हे तर खानदेश हा कवि-देश आहे म्हणून. या ठिकाणी जी कवींची परंपरा आहे, ती फार मोठी आहे. केशवसुत, बालकवी, मर्ढेकर, कवी विनायक यांचं बरचसं वास्तव्य खानदेशात होतं... या ठिकाणची रसिकता संघटित करणाऱ्या मंडळास शुभेच्छा."

यानंतरच्या आपल्या मुख्य विषयाकडे वळून श्री. कुसुमाग्रजांनी यानिमित्त फार चांगला विचार मांडला व साहित्यातील आग्रह-दुराग्रहांची परंपरा आजही कोण-कोणत्या स्वरूपात साहित्याची प्रगती थोपवून धरते आहे, याचे विश्लेषण केलं.

या निमित्त त्यांनी 'संस्कृती' या शब्दाचा व त्याचा मानवी जीवनाशी अस-संबंधाचे फार अचूक वर्णन केले. 'संघटना' म्हणजे 'संस्कृती' नव्हे या सोदाहर-णाच्या अपत्तीवरून संस्कृतीच्या प्रावाहाखाली दखल घेण्याचे कार्य साहित्यात करावे लागते व तेच ते करणारेच श्रेष्ठ साहित्य ठरते, असा विचार प्रकट केला. या बाबत ते पुढे म्हणाले, "संस्कृतीचा सर्वांत मोठा शत्रू तो, की जो संस्कृती ही अभंग आहे, एखाद्या दगडासारखी, डोंगरासारखी स्थिर आहे असं मानतो. संस्कृती ही प्रवाही वस्तू आहे; प्रवाही संस्था आहे. प्रचलित काळामध्ये जी 'मूल्ये' आपण 'सर्वस्व' मानतो ती काळाच्या ओघात नष्ट झालेली आपणांस दिसेल. 'स्वामि-निष्ठा' हे एक शिवकालीन मूल्य होते. परंतु आज 'मालक' या संस्थेसंबंधी जे ज्ञान आहे, भावना आहे, त्या भावनेमुळे हे मूल्य शिल्लक राहिलेले नाही. 'आई' असेच एक मूल्य पूर्वीच्या काळात कवितेतून दिसेल. आज 'आई' या विषयावर गेल्या दहा वर्षांत चांगली कविता– सुव्यांची सोडली तर – दिसत नाही. मग ही 'आई' गेली कुठे? सामाजिक जीवनात मानलेली मूल्ये हलके हलके घटत जात असतात.

आज कुटुंब-संस्थेचं जे विच्छेदन होत आहे, त्या परिस्थितीत आई-मुलगा बाप-मुलगा यांचे संबंध ४०–५० वर्षांपूर्वी होते तसे ते आज नाहीत. हे बदल जर साहित्यात कुठे ना कुठे प्रतिबिंबीत झाले नाहीत तर त्या साहित्यामध्ये जिवंतपणा कमी आहे, असं म्हणायला हरकत नाही.

केशवसुतांनी मराठी काव्यामध्ये आत्मानुभव आणला. यासाठी त्यांना क्रांति-कारकत्व देणं माझ्या दृष्टीने योग्य नव्हे. त्याआधी देखील तुकारामातून हा आत्मानु-

भव फार चांगला प्रकट झाला आहे. ही 'आत्मनिष्ठा' जास्त आहे. मग केशव-सुतांची थोरवी, युगप्रवर्तकत्व कशात आहे! तर बदलत्या काळाचं मर्म, त्याचं आकलन, Awareness हा प्रथमतः केशवसुतांच्या काव्यामध्ये प्रकट झाला. नव्या युगाच्या जाणीवा या माणसाच्या अंतःकरणापर्यंत पोचलेल्या आहेत हे आपणाला दिसून येईल. तीच गोष्ट हरी नारायण आपटे यांची.

माणसाचा अनुभव हा साहित्याचे अधिष्ठान असते. जीवनासंबंधीचे निरनिराळे अनुभव हे साहित्यात प्रकट होत असतात. ते जितक्या प्रामाणिकपणानं प्रकट होतील तितक्या त्या साहित्याचा कस वाढत असतो. म्हणूनच वाङ्मय कितीही लोकांनी लिहीलं, कितीही वर्षे लिहिलं तरी त्यात शिळेपणा येत नाही.

परंतु या अनुभवास प्रामाणिकपणाची जोड मिळाली नाही तर ज्याला साहित्यात Secondhand अनुभव म्हणतात, तो प्रकट होतो. संकेतात्मक लेखन वाङ्मयात पुष्कळदा येतं. ते चांगलं नसतं असं नाही. परंतु लेखकाचा अनुभव जर प्रामाणिक-पणानं प्रकट झालेली असेल, Project झाली असेल तर कस आपोआप वाढेल.

आणखी एका गोष्टीचा विचार करायचा आहे.

४०–५० वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रामध्ये जी संतांची, पंतांची कविता पाहिली तर असं लक्षात येतं की त्या काळात ज्या घटना घडत होत्या, त्याचं पुसटसंसुद्धा प्रतिबिंब या काव्यात दिसत नाही. कवी मोठे महाकवी होते याबद्दल तिळमात्र शंका नाही. परंतु जेव्हा एका समाजाचं काव्य म्हणून संपूर्ण काव्याचा विचार करतो, तेव्हा सामाजिक जीवनात निर्माण झालेल्या आंदोलनाचा, वादळांचा क्षोभ-प्रक्षोभ साहित्यापर्यंत वा काव्यापर्यंत पोचला नाही असं वाटतं. या सर्व कवींनी आपल्या मनाचे दरवाजे बंद करून टाकलेले आहेत आणि जीवनाकडे पाठ फिरवली आहे.

पानिपतची घटना ही महाराष्ट्रातली नव्हे तर भारतातील अतिशय मोठी घटना. महाराष्ट्राच्या पराक्रमाचा सर्वोच्च आविष्कार. या लढाईमुळे प्रत्येक घरात एक विधवा निर्माण झाली, परंतु कुठल्याही कवीच्या काव्यामध्ये त्याचा पुसटसा उल्लेख नाही. कारण वाङ्मयात काही दुराग्रह निर्माण झालेले असतात. हा दुराग्रह कोणता तर, या साहित्याच्या सुवर्ण-रथामध्ये मिरवायचा अधिकार कोणाला असेल तर तो फक्त अध्यात्मालाच आहे, परमार्थालाच आहे ही त्या काळातली रूढ समजूत. या समजुतीनं कवीच्या मनाचे दरवाजे बंद करून टाकलेले आहेत. या दुराग्रहानं केवळ साहित्याचीच हानी झाली नाही तर सामाजिक प्रगती-चीही हानी झाल्यावाचून राहात नाही.

चांगलं वाङ्मय, श्रेष्ठ वाङ्मय यांच्यासंबंधी काही कल्पना प्रसृत करण्यात येतात, की ज्यांच्यामध्ये माणसाचं कीटकरूप, माणसाची विफलता ज्यातून प्रकट होते, अशा प्रकारचं वाङ्मय चांगलं. अशा प्रकारचा दुराग्रह सध्याच्या साहित्या-

मध्ये दिसून येतो. यामुळ खरोखर प्रामाणिकपणानं लिहिणारी माणसं भांबावून जातात.

'हिंदू' समाजाचं जे दर्शन आहे, ते 'किराणा माला'च्या दुकानासारखं आहे. या दुकानात जातीपातींचा भरणा आहे, पण 'हिंदू' मिळणार नाही. पुन्हा प्रत्येक-जण आपापल्या जातीच्या कप्प्यात बंदिस्त. त्यामुळे आपण सर्व एका भावनेनं विचारच करीत नाही, एका मनगटाने कुठे प्रहार करीत नाही, काही उद्दिष्टांनी एकाद्या ध्येयाच्या पाठीमागे लागत नाही. हे जिणं अवस्थ आहे.

या जातीपलीकडचं जे विश्व आहे, त्या विश्वाशी इथला माणूस कधी जोडलाच जात नाही. मनानं नाही की अनुभवानं नाही. म्हणून इथलं वाङ्मय गेल्या १००–१५० वर्षांतलं मर्यादित राहीलं आहे. इंग्लिश अमेरिकन किंवा परकीय साहित्यात जे सामाजिक मन साहित्यात दिसतं, तसं आपल्याला दिसत नाही. जे दिसतं ते एका विशिष्ट वर्गाचं मन. ही परिस्थिती वाङ्मयाच्या परिपोषाला, उत्कर्षाला अगोदरच प्रतिकूल आहे. अर्थात ते आता ढासळून पडत आहे. या संस्कृतीमधला जो संघर्ष आता येऊ पहातो आहे, त्या संघर्षात साहित्यिकाला काही बाजू आहे की नाही ? त्याला कुठेतरी जाणीव असली पाहिजे. म्हणून विफलतेचे म्हणा, किंवा माणसाकडे कीटक म्हणून पहाण्याची जी वृत्ती आहे ही आजच्या सामाजिक जीवना-मध्ये हानिकारक आहे. असे मला वाटते.

हजारो वर्षानंतर काही एक नवीन समाजाचं बांधकाम आपल्या देशात होत आहे. त्याची जाणीव आपल्या ठिकाणी नसेल तर मला असं वाटतं की आपल्या हातून जे साहित्य निर्माण होईल, ते या समाजहिताच्या विरुद्ध म्हणा प्रतिगामी अशा स्वरूपाचं झाल्यावाचून रहाणार नाही.

ज्याला जीवनामधला अंधारच पहायचा आहे, वैफल्यच पहायचं आहे त्यानं जर तसाच विचार केला तर दुसरं काही दिसायचं नाही. विकृती पहाण्यासाठीच जर तुम्ही बाहेर पडलात तर जगाच्या व्यवहारामध्ये कुठलीच चांगली गोष्ट दिसणार नाही.

दुर्योधनाची गोष्ट आपल्याला माहीत आहे. कृष्णाने त्याला, जगामधला चांगला माणूस शोधून आणायला सांगितलं तो सर्व जगभर हिंडला आणि परत आला त्याला तसा माणूस आढळला नाही.

अर्थात प्रचारी साहित्य निर्माण करण्याचे मी म्हणत नाही. प्रचारात second-hand अनुभव येतो.

चांगल्या साहित्यामध्ये जे काही सुचविलं जातं ते 'सूचित' स्वरूपात मांडले जाते. संस्काराच्या रूपाने प्रकट होते. ते ढोबळ, Loud कधी असत नाही. एकाच गोष्टीसंबंधी कनिष्ठ वाङ्मय मोठ्यांदा ओरडतं, श्रेष्ठ वाङ्मय केवळ सूचना करतं. हा सूचनेचा जो रस्ता आहे ते तुमच्या अंत:करणामध्ये व्यक्तित्वामध्ये कुठेतरी

जाऊन पोचतो आणि अखेर चांगल्या साहित्यानं वाचकांचं व्यक्तिमत्व एका प्रमाणात संपन्न होतं.

या प्रचंड जगन्नाथाच्या रथाला आपला हात कुठेना कुठे तरी लागला पाहिजे आणि महाराष्ट्राच्या साहित्य-निर्मितीला या स्वातंत्र्याच्या स्वर्ग-बांधणीत काही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भाग घेता आला तर माझ्यासारख्या लेखकाला, वाचकाला, अतिशय आनंद होणार आहे."

□ □ □

---

व्यावहारिकदृष्टचा सामान्यात जमा होणारे हे चरित्र. पण या सामान्याने एका विशाल उद्दिष्टाच्या रथाशी स्वतःला बांधून घेतले आणि रस्त्यावरच्या दगडधोंडयांनी शरीर व मन घायाळ होत असतांही कधी सुखाचा निवारा शोधला नाही. जखमी होऊनही पराभूत न झालेल्या, प्रसादाच्या अपेक्षेवाचून पूजा करणाऱ्या, उजेडाच्या उपासनेसाठी काळोख विकत घेणाऱ्या माणसाची, एका विठू मास्तराची ही कहाणी. त्या कार्यकर्त्याच्या शब्दात थोडा बदल करून मी शेवटी म्हणेन, 'लाँग लिव्ह विठू मास्तर!'

—कुसुमाग्रज

---

कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके

दहा रुपये

राजहंस प्रकाशन

---

मनोविकारशास्त्र

पाऱ्यापेक्षाही चंचळ
वाऱ्यापेक्षाही वेगवान असं

# माणसाचं मन

डॉ. प्रकाश श्री. साठे

माणसाचं मन एक अजब चीज आहे. मोजक्या शब्दात त्याची व्याख्या करणं-देखील अवघड आहे. शास्त्राच्या विद्यार्थ्याला हे ठाऊक आहे की, ज्या गोष्टीची व्याख्या करता येत नाही, तिच्या वर्णनासाठी निरनिराळ्या उपमा उदाहरणाचं सहाय्य घ्यावे लागतं. आता मनाचंच पहा ना ? ते पाऱ्यापेक्षाही चंचळ असतं. त्याचा वेग सर्वात जास्त असतो. एका विचारावरून दुसऱ्या विचाराकडे ते फार झटकन् वळतं. कित्येक वेळा ते माणसाच्या ताब्यात नसतं, त्याच्या इच्छेविरुद्ध अनेक विचार येतात. ते आवरता आवरत नाहीत. नाथांनी म्हणूनच त्याला ' ओढाळ गुरू ' म्हटलं असावं.

माणसाच्या मनात असंख्य विचारांची इतकी गर्दी झालेली असते की, एवढे विचार मनात राहतात कसे असा प्रश्न पडतो. मनात बऱ्याच वेळा परस्परविरोधी विचाराचं द्वंद्व चालू असतं. घरात खूप पसारा पडलाय, मुलं गडबड करताहेत अशा वेळी अचानक कुणी पाहुणा आला तर आपण वर वर का होईना आवरासावर करतो. मुलांचा खेळ कॉटच्या मागे ढकलून देतो, मुलांना बाहेर पाठवून देतो आणि त्या पाहुण्याच्या स्वागताला सज्ज होतो. तसंच विचारात गढलेल्या माणसाचं होतं. दुसऱ्या माणसाच्या आगमनाची जाणीव होताच तो आपले विचार क्षणात गुंडाळून ठेवतो आणि त्याच्याशी संभाषणास सुरुवात करतो. बहिणाबाई चौधरींनी आपल्या काव्यात मनाचं मोठ्या समर्पक शब्दात वर्णन केलं आहे. खसखशीच्या दाण्याएवढं असणारं मन हे क्षणात आभाळातदेखील न मावण्याइतकं मोठं होतं. एखाद्या स्वैर पक्ष्यासारखं ते भराऱ्या मारतं आणि त्याचा थांग लागणं अशक्य असतं. असं त्यांनी म्हटलंय.

दृष्टी हे जसं डोळ्याचं कार्य, ऐकणं हे कानाचं तसं मन हे शरीराचं कार्य (Mind is tantion of body) आहे असं म्हणतात. ते शरीरापासून वेगळं करणं शक्य नाही. हे मन शरीरात असतं तरी कुठे ? पूर्वी अशी कल्पना होती की ते

हृदयात असतं. प्रेमाचा न् हृदयाचा संबंध तर जगजाहीरच आहे. एखाद्या दुष्ट किंवा निष्ठुर माणसाचं वर्णन 'उलटच्या काळजाचा' किंवा 'पाषाण हृदयी' असं केलं जाण्याचं कारण बहुधा हेच असावं. नंतर मनाचा न् डोक्याचा संबंध लावला जाऊ लागला. मग 'तापट डोक्याचा' उलटच्या खोपडीचा अशी वर्णनं अस्तित्वात येऊ लागली. शास्त्र जसजसं प्रगट होऊ लागलं. काही काही गूढांचा अर्थ कळू लागला तसं माहीत झालं की मनाचा न् मेंदूचा संबंध आहे. आता प्रयोगांनी असं दाखवून दिलं गेलंय की मेंदूचा ठराविक भाग जर काम करीनासा झाला (किंवा केला गेला) तर माणसाचं व्यक्तिमत्व, वर्तन आणि स्वभाव यात आमूलाग्र बदल घडू शकतो. एवढं झालं तरी मेंदूच्या निश्चित कुठल्या भागात मनाचं वास्तव्य असतं हे ठाऊक नाही.

माणसाचं मन जाणण्याचं सोपं साधन म्हणजे त्याच्या वर्तनाचा अभ्यास करणं आणि त्याच्या विचारांची माहिती करून घेणं. माणसाच्या मनाची तुलना पाण्यावर तरंगणाऱ्या हिमनगाशी करतात त्याचा जेमतेम $\frac{1}{7}$ भाग दिसण्यासारखा, पाण्याच्या पृष्ठभागावर, बाकीचा सगळा भाग खोल पाण्यात ! दिसणारा, इतरांना कळणारा असा मनाचा भाग अगदी थोडा एवढंच काय पण माणसाला स्वतःलादेखील त्याच्या मनाची फार थोडी माहिती असते. मानवी मनाच्या महासागराचं कोडं उलगडण्याचे प्रयत्न होऊ लागले. त्याच्या जागृतावस्थेतल्या वर्तनाचा अभ्यास तर होऊ लागलाच, पण 'मनी नसे ते स्वप्नी दिसे' हे कळायला लागल्यापासून स्वप्नाचाही अभ्यास होऊ लागला. सर्व स्वप्नाचा अर्थ लावणे अशक्य ठरायला लागलं. स्वप्नसृष्टी आणि माणसाची सत्य परिस्थिती यांच्यात फार फरक आढळू लागला. माणसाच्या सुप्त इच्छा स्वप्नात डोकं वर काढतात, काही इच्छांची पूर्ति स्वप्नात होते. हे समजू लागलं.

रोजच्या व्यवहारात पाहिल्यावर असं दिसलं, की बऱ्याच वेळा बोलायच्या नसलेल्या गोष्टी माणूस चटकन् बोलून जातो. त्याची किंवा त्याच्याकडून अपेक्षा असते त्याच्यापेक्षा भलतंच काहीतरी ? ते बोलणं, 'जिभेची गफलत' (Ship of tongue) या सदरात मोलं जाऊ लागलं. पण या बोलण्याला अर्थ असतो हे गाढ अभ्यासानंतर कळायला लागलं. उदाहरणानं स्पष्ट करतो. हल्ली बऱ्याच खाजगी संस्था शाळा, कॉलेजेस चालवतात. त्यात काही धनाढ्य, पुढारी लोकांचा भाग मोठा असतो. हे लोक आले की राजकारण आलंच, मग प्राचार्यांचे न् या लोकांचे खटके उडतात. त्यांच्यात वितुष्टही येतं. प्राचार्यांच्या मनात त्यांच्याविषयी घृणा निर्माण होते. त्यांना ती दाखवता येत नाही. म्हणून मग ती अंतर्मनात (सुप्त) ढकलून दिली जाते. अशाच एका कॉलेजातल्या समारंभाला हे पुढारी मुख्य पाहुणे म्हणून येतात. त्यांचा परिचय करून द्यायचे काम प्राचार्यांवर पडतं. ते उठतात आणि बोलायला सुरुवात करतात, 'आजचे सामान्य पाहुणे'...मोठा हंशा पिकतो.

वास्तविक पहाता त्यांना म्हणायचं आहे, 'सन्मान्य पाहुणे' पण पोटातले विचार जिभेच्या गफलतीमुळे असे ओठातनं बाहेर पडतात. अन् मानसशास्त्र विभागातला अध्यापक वर्ग याचं इंगित जाणून असतो. असो.

अशा रीतीने वर्तन आणि विचारांचा अभ्यास, स्वप्नसृष्टीची माहिती यांच्या सहाय्याने मनाची ओळख व्हायला लागली आणि मनाचे दोन भाग केले गेले. एक संज्ञाशील (conscious) ज्या भागाची माणसाला जाणीव असते तो आणि जाणिवेच्या पलिकडला (unconscious) संज्ञातीत आहे असा दुसरा या दोहोंच्या उंबरठ्यावरही काही गोष्टी असतात. त्या काही प्रयत्नानंतर जाणीवेत येऊ शकतात. त्या भागाला म्हणतात preconscious.

माणसाच्या सुप्त मनात प्रेरणा निर्माण होतात, जागृत मन त्यांचं नियमन करतं आणि त्यानुसार माणसाचं वर्तन घडतं, जागृतमनाचा सुप्त मनावरचा संयम कमी झाला की माणसाच्या हातून काहीतरी अनपेक्षित, विचित्र घडतं. एका कंटाळवाणं शिकवणाऱ्या प्राध्यापकाच्या तासाला एक विद्यार्थी बसलाय, ओघानंच भलता बोअर झालाय. त्याच्या मनातून प्रेरणा निघते की एक सिगरेट ओढल्यावर हा कंटाळा जाईल. मग त्याला सिगरेट ओढायची इच्छा होते. पण त्याच्या जागृत-मनाला जाणीव असते की आता तास चालू असताना हे करणं शक्य नाही. ही इच्छा थोडी पुढे ढकलली जाते आणि तास संपला रे संपला की तो पटकन् बाहेर पडतो अन् सिगरेट पेटवतो. हे घडतं जागृतमनाच्या संयमामुळे ! पण तो कमी झाला की इच्छेचं पारडं जड होतं. तो वर्गात जांभया देऊ लागतो आणि अकस्मात दार उघडून बाहेर निघून जातो. हे वर्तन त्याच्याकडून अपेक्षित नाही आणि म्हणून ते अयोग्य ठरतं.

हे झालं सिगरेट ओढण्याच्या साध्या इच्छेच्याबाबतीत. काही इच्छा (विशेषतः लैंगिक स्वरूपाच्या) अशा असतात, की त्यांची जाणीवदेखील माणसाला अस्वस्थ करून सोडते. अशी इच्छा झाल्याबद्दल त्याला कमीपणा वाटतो न् ती इच्छा संज्ञातीत भागात ढकलून दिली जाते. काही इच्छा कधीच पुऱ्या होणाऱ्या नसतात. मग इच्छा आणि परिस्थिती यांच्यात संघर्ष सुरू होतो. माणूस निराश होतो. त्यातनं विवंचना सुरू होतात. या संघर्षात माणसाचा समतोल ढासळत नाही तोपर्यंत तो 'नॉर्मल' असतो. एकदा का तो ढळला की तो जास्त काळजी करू लागतो, अस्वस्थ, निश्क्रिय अन् विचारमग्न होतो. त्याच्या कामातलं कौशल्य, एकाग्रता, स्थितता कमी होतात. त्याच्या भुकेवर, झोपेवर परिणाम होतो. त्याच्या वर्तनात, विचारात बदल होतो आणि तो मनोरुग्ण ठरतो.

माणसामाणसाच्या वागण्यात, बोलण्यात, विचारातील फरक असतो. यामुळे त्यातली योग्यायोग्यता ठरवणं बऱ्याच वेळा कठीण जातं. काळवेळ, संस्कृती, समाजातल्या चालीरीती, माणसाचं शिक्षण, त्याचा स्तर (Status) या गोष्टीवर

त्याच्या वागण्याची, बोलण्याची, विचारांची योग्यायोग्यता अवलंबून असते. कशी ते पहा! पाश्चात्य संस्कृतींत स्त्रीपुरुषांनी चारचौघांच्या उपस्थितीत एकमेकांचं चुंबन घेणं अमान्य मानलं जात नाही, पण आपल्याकडे ते अयोग्य ठरतं. हा झाला संस्कृतीतला फरक. आता हेच चुंबन जर एकांतात घेतलं तर ते आपल्या संस्कृतीतही योग्य ठरतं. म्हणजे काळवेळेमधल्या भिन्नतेमुळे या कृत्याची योग्यायोग्यता बदलली. खेडेगावात बापाच्या चंचीतली तंबाखू, सुपारी काढून मुलगा त्याच्यासमोरच मळेल, लावील आणि पिचकारीसुद्धा मारील. तिथे योग्य ठरणारं समाजाला चालणारं हे वर्तन शहरात मध्यम वर्गात अयोग्य ठरेल. मध्यम वर्गातल्या मुलाला आपले वडील मद्यपान करतात हे माहीतही नसेल, त्याने वडिलासमोर मद्यपान करणं तर दूरच राहिलं. पण प्रगत उच्च वर्गात बापलेक एका टेबलावर बसून मद्यपान करतात ते अयोग्य ठरत नाही.



मोठ्या माणसानं स्वत:शीच मोठ्यांदा बोलणं हे योग्य (normal) म्हणायचं का मानसिक रोगाचं लक्षण समजायचं. पण ते परिस्थितीवर अवलंबून राहील. तुम्ही तुमच्या स्कुटरवरून कामाला निघालात. रोजच्या वेळेपेक्षा थोडंसं उशीरा. पण वाटेत वेगानं जाऊन हा उशीर तुम्ही भरून काढणार अशी तुम्हांला खात्री आहे. रस्त्यावर विशेष गर्दी नाही, तुम्ही वेग घेतलात चौकापाशी आलात (समाज बेलबाग किंवा जंगलीमहाराज चौक) आणि पहाता तो तुमच्यादेखत हिरवा दिवा जाऊन तांबडा झाला आहे आणि तुमच्या ध्यानात येतं की तुम्हांला सुमारे दोन मिनिटं थांबावं लागणार आहे. मग तुम्ही वैतागता, एक शिवी हासडता अन् चरफडत स्वत:शीच म्हणता 'आम्हांला उशीर झाला की चौकात तांबडा दिवा अगदी ठरलेला !' पण एवढ्या बोलण्यानं काही तुम्ही (abnormal) ठरत नाही. आत्ता ऑफिसात पोचल्यावर देखील तुम्ही स्वत:शील बोलत राहिलात तर मात्र खरंच तांबडा दिवा (धोक्याचा) आहे बरं का !. कारण स्वत:शी बोलत रहाणं हे एका मानसिक रोगाचं लक्षण आहे.

अशा रीतीने काळवेळ, परिस्थिती, संस्कृती, समाजातल्या चालीरीती, माणसाचं शिक्षण, समाजातले स्थान या गोष्टींच्या पार्श्वभूमीवर. त्याचं वर्तन, विचार, भावना, ज्ञान, स्मरणशक्ती या गोष्टींचं मूल्यमापन करून मग तो मनोरुग्ण आहे की नाही हे ठरवावं लागतं. खाली दिलेल्या सर्व प्रश्नांची होकारार्थी उत्तरे देणारा माणूस सर्वसाधारणपणे मनोविकारांपासून मुक्त आहे असं समजायला हरकत नाही (ही प्रश्नावली सोडवून त्यावरून निष्कर्ष काढायची जबाबदारी वाचकांनी न घेणं इष्ट ! )

१. तुमच्यात मनोविकाराच्या लक्षणांचा अभाव आहे ना ? (विशेषत: भूक, झोप, एकाग्रचित्तपणा यांच्या तक्रारींचा)

२. तुमची मानसिक कार्यप्रक्रिया सुव्यवस्थित आणि संकलित आहे ?

३. बदलत्या परिस्थितीशी सामावून घेण्याची वृत्ती व त्यासाठी आवश्यक असलेला लवचिकपणा तुमच्याजवळ आहेत का ?

४. तुलनात्मक परिस्थितीत तुमचे वर्तन सारखेच असते का ? (की ज्यामुळे तुमच्या वर्तनाबद्दल बांधलेले आडाखे चुकणार नाहीत) साहेबाच्या भाषेचा थोडा आधार घेऊन Do you show consistency of response in similar situations ?

५. तुमच्या वैयक्तिक गरजा व सामाजिक गरजा यात समतोल आहे काय ?

६. तुमची परिस्थिती आणि व्यक्तिगत मर्यादा यांची तुम्हांला जाणीव आहे ? आणि तुम्ही विवाहित असलत तर—(जरा खासगीत)

७. तुमचं लैंगिक जीवन परस्परांत (च) समाधानदायक आहे का ?

□ □ □

# कविता

## शब्दमोल

फार मोलाचा वाटतो
एकेक शब्द मला
काहीतरी सांगत असतो
प्रत्येक शब्द मला.
अंतरंगातील आशयाला
आहे शब्दांचा आधार
शब्दाशब्दातून वाहते
भाव चैतन्याची धार.
ज्ञानियाच्या राजालाही
होती शब्दांचीच जाण
म्हणूनिया ज्ञानेश्वरी
बने साहित्याची खाण.
शब्द संतांनी ओळखिला
शब्द संतांनी शिकविला
शब्दाशब्दातून समाजाला
अमृताचा घोट दिला.
शब्द शास्त्रज्ञांनी जाणियेला
शब्द आडाशी फेकला.
या शब्दांच्या आधारे
चंद्र मानवांनीं स्पर्शियेला.
शब्द भावनेचे फूल
शब्द मनाची चाहूल
शब्द म्हणजे आशयाच्या
अंगावरची खरी झूल.
शब्द विचारांचा दूत
शब्द मेंदूची विद्युत
शब्दाशब्दांनी चेतविली
प्रतिभेची दिव्य ज्योत.
शब्द वाणीचे भूषण
शब्द स्वतःचे दर्शन
शब्द अनाठायी
आहे वाणीचे भूषण.
...असा आहे शब्द इथे
शब्द म्हणजे खरा बोल
लाखापेक्षाही लाखाचे,
सदा असते 'शब्दमोल'...

—दुर्गादास बोर्डे

पण–

आगीच्या दाहानं भाजुन जळून जावं–
पण मनातल्या मनात असं विझू नये–
खोलवर रुतलेली मुळं
तोडून उन्मळून पडावं
पण रुक्ष–कोरडं असं वठू नये
उसळत्या पुरात बुडून जावं–
पण या तीरी–त्या तीरी–
दोघांनी उभं राहू नये

कुंदा फडणीस

## आस्वाद

आशयाला साकार करणाऱ्या शब्दाविषयीच्या भावना दुर्गादास का. बोर्डे यांनी ‘शब्दमोल’ या कवितेत व्यक्त केल्या आहेत. सामान्यांना अपरिचित असणारा एकेक शब्द कवीच्या संवेदनाशील मनाला मात्र अतिशय मोलाचा वाटत असतो. सामान्यांच्या दृष्टीला न समजणारे काहीतरी गूढ तो कवीला सांगत असतो. कारण शब्दांच्या अंतरंगातील आशय समजून घेण्याचे, त्यातून वाहणाऱ्या भाव-चैतन्याच्या धारेत अवगाहन करण्याचे सामर्थ्य कवीमध्ये असते. शब्दाचे सामर्थ्य कवीच ओळखू शकतो. अशा शब्दसामर्थ्याचे विविध पैलू या कवितेत बोर्डे यांनी उत्कटतेने सांगितले आहेत. ज्ञानियांच्या राजाने सोनियाची खाण बनविलेला, संतांनी अमृताचे घोट साठविलेला, शास्त्रज्ञांनी चंद्रस्पर्श घडविलेला शब्द कवीला मोठा अपूर्वाईचा वाटतो. भावनेचे फूल, मनाची चाहूल, विचारांचा दूत, मेंदूची विद्युत् इत्यादी पदबंध शब्दाची अनेकपदरी वैशिष्ट्ये स्पष्ट करतात.

कुंदा फडणीस यांच्या ‘पण–’ या कवितेत आवेगपूर्ण भावनेच्या आवाहनाची अपेक्षा आवेगपूर्ण भाषेत सांगितलेली आहे. या कवयित्रीला भावनेचा आवेग सर्वांगात भिनून जायला हवा आहे. मग या आवेगात भाजून, जळून, उन्मळून, बुडून जायलाही ती तयार आहे. उत्सुक आहे. मुकाटयाने विझून जाणे, रुक्षकोरडे राहणे तिला मंजूर नाही. शेवटल्या दोन ओळीतील प्रतिमेमुळे या कवितेतील आवेगपूर्ण आवाहन बेभान प्रीतीचे आहे, ही गोष्ट स्पष्ट होते. कवितेला एक सुंदर विरोधलय लाभलेली आहे. उन्मुक्त समर्पणाची हौस व नामर्द पराभवाचा तिटकारा या विरोधलयातून अधिकाधिक गडद होत गेला आहे. या विरोधाची अधिकाधिक अर्थपूर्णतेने विस्तारत जाणारी आवर्तने शेवटच्या प्रतिभेपाशी एकदम अपेक्षेने थबकतात आणि परिणामाचा परमोच्च बिंदू गाठतात.

–रसिक




"**य**शवंत देव इथंच राहतात ना ?" बाहेरून एका स्त्रीचा आवाज आला. ही नक्कीच आशा असावी असं मी मनात म्हटलं.

"हो; इथंच राहतात. काय काम आपलं ?" गोविंदनं बैठकीतून विचारलं.

आशा जोशी या वेळी मला भेटायला येणार होती. मी कपडे करीत होतो. त्याचं बोलणं मला ऐकायला येत होतं. मला गोविंदचा राग आला. अगत्यानं या म्हणायचं तर बसलाय प्रश्न विचारीत.

'त्यांना भेटायचं आहे!' तिचं उत्तर.

'थांबा इथं. मी बोलावतो.' असं सांगून गोविंद मला येऊन म्हणाला, 'बाबूजी, भाईर एक बाई...'

मी पुढं त्याला बोलूच दिलं नाही. म्हटलं, 'विचारतोस काय? जा. बसायला सांग. मी येतोच...'

मी बैठकीत आलो. आश्चर्य वाटलं. कारण? समोर खुर्चीवर एक खेडवळ बाई बसली होती. पंचवीस-सव्वीस वर्षांची असावी. जुनी पांढरी चोळी अन् जुनं हिरवं लुगडं नेसलेली. पायात मोठाले तोडे, कानात पितळेच्या बाळ्या, कपाळावर रुपाया-एवढं कुंकू, डोळ्यात काजळ घातलेलं. पायात चांभारी चप्पल. जाडजूड तेल लावलेल्या. म्हणून मातीचा थर बसलाय त्यावर. बाकी सगळं ठीक होतं. नाकी-डोळी चांगली, रंगानं गोरी; केस व्यवस्थित लावलेले, वेष सोडला तर ती दिसायला सुंदर होती, मोहक होती. पण... बसली कशी फतकल मारून. हातात माझं पुस्तक आहे, "मानव धर्म वाढवावा!' या नावाचं.

---

# बोलके शंख

फार मोठ्या आशेनं आले होते. वाटलं सार्थक होईल. पण.... हे घ्या आपलं पुस्तक.

**कुंदन पुरी**

---

परवाच बाबांचं पत्र आलं होतं, की अमरावतीला कृष्ण जोशीकडे जा अन् त्यांची मुलगी आशा बघून घे. भाऊ म्हणत होते, की मुलगी सुंदर आहे. लाखात उठून दिसावी अशी सुरेख. एम्. ए. आहे. याच वर्षी शिवाजी कॉलेजमध्ये मराठीची प्राध्यापक म्हणून लागली आहे. कालच कृष्ण जोशी यांचं पत्र आलं होतं की ७–८ मे पर्यंत येऊन जाणे. अन् आज आशाचं पत्र आलं, की ती स्वतः दि. २ मे ला मला भेटायला येणार आहे. आज २ मे आहे. मुलगी बरीच धीट दिसते. तिनं लिहलं होतं, "आपण मला बघायला येणार आहात. हा कार्यक्रम दोन-चार माणसांच्या उपस्थितीत होईल. सगळ्यांच्या नजरा आपल्यावर खिळलेल्या असतील,

अशा वेळी बघायची लाज...तर दिलखुलास बोलणं कसं होईल ? आपल्या कादंबरी-बद्दल आपलं अभिनंदन कसं करता येईल...आपली कादंबरी मला इतकी आवडली, की...मनानं मी तुम्हांला पती मानलं; अधीर झाले...आपणांस बघण्यासाठी. पण मी आपणांस पसंत पडेन की नाही ही शंका येते...भविष्यकाळात काही का घडेना; निदान आपल्या अभिनंदनाचा 'चान्स' मी गमावणार नाही. एरवी तरी मला माझ्या आत्याकडे यावयाचं होतंच."

स्वतःच्या पत्नीबद्दल माझ्या काही फार मोठ्या कल्पना नाहीत. दिसायला साधारण असली तरी चालेल पण सुस्वभावी असली पाहिजे. आशाबद्दल मी एवढं ऐकलं, की माझ्या मनात 'आपली भावी पत्नी' अशी भावना निर्माण झाली होती.

मी स्वतःला सावरलं. माहीत असूनही मी संथपणे विचारले,

"कोण हवंय तुम्हांला ?"

"यशवंत देव !" ती म्हणाली.

"मीच तो !"

तिनं सस्मित मला नमस्कार केला. मीही मंत्री टाईप स्मित हास्य केलं नि म्हटलं,

"नमस्कार !' मी खुर्चीवर बसत विचारलं, "काय काम आहे ?"

'फार महत्त्वाचं काम आहे जी ! पह्यले तुमचं अभिनंदन करत्ये.. !"

'कशासाठी ?'

"आपल्या 'मानव धर्म वाढवावा' या पुस्तकाबद्दल."

मला आनंद झाला. दोन महिन्यांपूर्वी मी अगदी भीत भीतच माझी पहिली कादंबरी प्रसिद्धी केली. पण मी सुदैवी ठरलो. कारण अलिकडे दररोज जाणकार लोकांची अभिनंदपर पत्रे येत असतात. त्या सर्वांपेक्षा या समोरच्या स्त्रीनं दाखविलेली आपुलकी लाख मोलाची ! सामान्यातल्या सामान्य माणसानं आपुलकीनं पुस्तक वाचावं अन् घरी येऊन अभिनंदन करावं ही अभिमानास्पद बाब आहे. असे थोर भाग्य कुठल्याच साहित्यिकाला लाभलेलं नाही. मी कृतज्ञतेनं तिच्याकडे बघत विचारलं, 'आपण कुठल्या ?'

'मी का...अं...धनगरवाडीची ! इथून ४ मैलांवर गाव आहे. पायी चालत आले. मोटर नाही जात. उन्हाळ्याचे दिवस. अंग भाजलंय नुसतं ! घाम की घाम...' असं म्हणत तिनं लुगड्याच्या पदरानं गळ्याजवळचा घाम पुसला.

"बराच त्रास झाला तुम्हांला. पत्ता कसा मिळाला ?"

"पुस्तकात आहे ना ? हे शहर काही मला नवं नाही."

"अभिनंदनाबद्दल आभारी आहे. कादंबरी बरीच आवडलेली दिसते ?"

"होय ! ती कादंबरी नाही...सत्य जीवन आहे खेड्यातलं, हुबेहूब !

"आपण ही कादंबरी कशी मिळविली ?"

"कशी म्हणजे...आमच्या देशमुख गुरुजींनं शाळेसाठी घेतली होती. मला

वाचनाचा नाद. मला त्यांच्याकडून मिळाली. मला इतकी आवडली, की स्वतःच विकत घेतली...!"

मी गोविंदला चहा आणण्यास सांगितले. हा माझा नोकर. इथे मी एकटाच असतो. माझी सारी व्यवस्था तोच करतो.

"नको, नको. मला चहा नको... महत्त्वाचं बोलायचंय !"

"वाऽ तुम्ही इतक्या लांबून यावं, आपुलकी दाखवावी. अन् मी चहा पण पाजू नये, ही काय माणूसकी झाली ?...बोला, काय महत्त्वाचं बोलणार...!" मी उत्साहानं म्हटलं.

"आपली कादंबरी फार नामी आहे बघा. कादंबरीतला डॉक्टरबाबू बाँबेला जायचं सोडून कोळीवाड्याला आला. त्याचा जन्म तिथलाच. गावाची सेवा करायची. शहरात लाखो रुपये मिळाले असते. पण गाव सुधारण्यापायी त्यांनी महान त्याग केला. दवाखाना टाकला. गरिबांना मोफत दवाई. शाळा काढली. स्वभावानं खूप चांगला माणूस पण लोक दूर दूर राहिले. जुन्या रुढीनं जखडलेली मनं...कॉलऱ्याच्या साथीत दवाई न घेता मरीआईला कोंबडं-बकरं कापणारे; शाळेत तर कुणीच जाईना, काय करायचं शिकून ? सर्वाभूती परमेश्वर मानणारे पण मांग, महार, ब्राह्मण, मराठा मानणारे. डॉक्टर जातपात मानत नाही. सगळी माणसं सारखी. सारखं रक्त, सारख्या भावना ! सगळ्या जाती धंद्या परमाणं झाल्या. लोक भले खत्रूड, म्हणाले, 'डागदरा लई ढोंगी हायीस ! बकबक नको आम्हांला. सगळे एक ना ? कर मंग खंड्या महाराच्या पोरीशी लगन.' खंड्याची पोरगी धुरपदी. पोट आलं होतं. पाटलाच्याच पोराचं काम. समाज असा आहे बघा. असं करताना ते बाटत नाहीत पण दिवसा स्पर्श झाला की शितोंडा घेतात. डाक्टर लई बाणेदार माणूस. केलं की त्यानं लगन तिच्याशी. लगनानंतर तीन महिन्यात धुरपदीला पोरगी झाली. लोक हसतात....डॉक्टरचं एकच म्हणणं 'हिंदू, मुसलमान, शीख, इसाई, बुद्ध धर्म, सारं खोटं. मानवधर्म खरा. सर्वश्रेष्ठ. मानवधर्म वाढविला पाहिजे !"

ती न रुकता एवढं बोलली. मी हसत म्हटले, 'पुस्तक पाठ केलेलं दिसतय !'

"बऱ्याचवेळा वाचलंय म्हणून पाठ झालीत काही वाक्यं...' असं म्हणत तिनं स्मित केलं. गोविंदनं चहा आणला. घ्या म्हटलं. 'उगीचच तरास घेतला सायेब !' तिनं कपबशी घेत म्हटलं. फुर्रऽ फुर्रऽऽ करीत चहा प्याली. मी सुपारी दिली. आशा येणार होती...केव्हा येणार होती...केव्हा येणार ?...गोविंद कपबशा घेऊन गेला. मी म्हटलं, 'हंऽ बोला. काय महत्त्वाचं बोलणार...!' ती एकदोन मिनिटं स्तब्ध बसली. काहीसा विचार करून ती बोलली, 'माझी कथा सांगणार आहे. मी लक्ष देऊन ऐकू लागलो.

"मी धनगरवाडीच्या खंड्यानाईकाची मुलगी. देवकी माझं नाव. जातीनं महार.

जन्मताच माय मेली. दोन वरसानं बा मेला. चुलत्यानं परतपाळ केला. गावातल्या शाळेत मी मॅट्रीक झाले. त्या वरसी चुलता मेला. लोक पांढऱ्या पायाची म्हणतात. माणसं गिळी म्हणतात. चुलत्याला मुलबाळ नव्हतं म्हणून मी त्याची लाडकी होते. आता चुलती सगट सगळे हेटाळणी करतात. चुलती बरं पहात नाही !'

" अरेरेऽऽ !" मी कळवळून उद्गारलो. किंचित थांबून ती पुढं म्हणाली, " मॅट्रीक होऊन पाच वरसं झाली. मी शिकलेली...आमच्या समाजात शिकलेली मुलं फारच थोडी. मी कुणाशीही लगन करायला तयार होती पण माझ्याशी कुणीच लगन करीत नाही. मी पण ठरवलं होतं, की लगन करायचं नाही. पण..." तिनं मान खाली घातली.

मी उत्सुकतेनं म्हटलं, " पण काय ?"

" पण...तुमची कादंबरी वाचून माझ्या मनात आशेची वेल फुलली आहे...मी तुमच्या प्रेमात पडल्ये...!"

" काऽय ?" मी आवंढा गिळत म्हटले.

" हो. इतका योग्य पुरुष मला नाही सापडणार...तुमचं लगन झालं ?"

" नाही !"

" कुण्या पोरीवर मन जडलंय् ?"

" नाही !" मी जवळ जवळ ओरडलोच.

" असं काय चिडता ? मी जीव तोडून बोलत्येय की मी प्रेम..." ती हळू अन् दर्दभऱ्या आवाजात बोलली.

" बोलतांनी लाज कशी नाही वाटत ?"

" लाज ! कुठलीही बाई नवऱ्याला अन् नर्सला लाजत नाही. माझ्या जिवाचा सवाल ! लाजून कसं होईल ? खरंच सांगते. हो म्हणा. मी तुमच्याबगर राहू शकणार नाही. किती दिवसापासून मी येईन म्हणते..."

मी मनात म्हटलं, " साली, ही काय आफत ! आशा येणार आहे, ती जर अचानक आली तर...ही तर चक्क गळयात पडत्येय् ! हिचा वरचा मजला रिकामा आहे की काय ?" डोकं चक्रावलं. मन संयत करून मी समजावू लागलो, " बाई, तू चांगली शहाणी आहेस ! असं कुणाच्या गळी पडू नये. तू कोण, कुठली, ...तुझं नि माझं कसं जमावं ? मी प्राध्यापक, प्रसिद्ध साहित्यिक...तू एक खेडवळ बाई...मी ब्राह्मण, तू महाराची पोरगी...!"

" सायेब, असं म्हणू नका. मी तुमच्याशिवाय जगू कसं ? जागेपणी स्वप्नी तुमचाच विचार, ब्राह्मण, महार...आपण सारी माणसं ना ? असं तुम्ही ह्या पुस्तकात म्हटलं ना ? ह्या कथेतल्या धुरपदीसारखी मी काही बावळट नाही. तिच्यासारखं माझं काही पोट आलेलं नाही. माझ्या खेडवळपणावर जाऊ नका. दोन महिन्यात सारं बदलेल. सगळ्या शिकलेल्या बायांना माग टाकीन, सुखी करीन.. !"

मी काकुळतीनं म्हटलं, " माझे आई, आटप आता. ते सारं राहू दे पुस्तकातलं पुस्तकात. व्यवहार देखील पाळला पाहिजे. नाहीतर लोक शेण घालतील माझ्या तोंडात...!"

" सायेब, प्रेम आंधळं असतं, अधीर असतं म्हणून मी बोलले. मला हे काय माहीत, की तुम्ही पुस्तकात एक बोलता अन् . !"

" कृपा करून उठा आता !" मी भयंकर चिडलो.

" बरं. उठते. फार मोठ्या आशेनं आले होते. वाटलं जीवनाचं सार्थक होईल. हे घ्या आपलं पुस्तक. आपण दुसरं काहीही कारण सांगून नाकारलं असतं तरीही चाललं असतं. मला वाटलं, की आपण काही वेगळे असाल पण...ब्राह्मण, महार असा आपणही विचार करता. सगळे एकाच माळेचे मणी. बोलके शंख. शब्दांचे परमेश्वर. म्हणून तर कुठलाच क्रांतिकारी विचार समाजात मूळ धरत नाही. बरं...!" डोळ्यातील अश्रू पुसत ती उठली. या वाक्यानं तर मी पार गोंधळलो. या अनपेक्षीत प्रकारानं मी इतका भांबावलो, की ती गेली तरी मी नुसता बसून राहिलो. बघत होतो तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे. तिनं हळूच गेटचं फाटक उघडलं. रस्त्यावर गेली. समोरून एक रिक्षा जात होता. तिनं थांबवला अन् बघता बघता रिक्षा निघून गेला.

मी यंत्रासारखा उठलो–समोरचं पुस्तक 'कपाटात ठेवण्यासाठी. एका खेडूत बाईनं माझंच तत्त्वज्ञान माझ्यावर उलटविलं होतं. कुठल्याही साहित्यीकाला असा अपमान सहन करावा लागला नसेल. माझे हात थर थर कापत होते. ते पुस्तक हातातून खाली पडले. ते पुस्तक उचलण्यासाठी मी खाली वाकलो आणि...त्या पुस्तकातून एक कार्ड पडलं होतं. त्यावरील अक्षरे पाहून मला चक्कर आली. अंगातली शक्ती संपली. मी कसाबसा खुर्चीवर बसलो. डोळे मिटून घेतले. कादंबरीतला डॉक्टर खदखदून हसत असल्याचा मला भास झाला. त्या कार्डावरची अक्षरे डोळ्यासमोर नाचू लागली. कार्डावर लिहूलं होतं––

" अभिनंदन !" ◻

## पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी

## पुस्तके

म. श्री. दीक्षितांचा

# सुरस चक्रवर्ती नेपोलियन

**वि. ग. कानिटकर**

एखादा सुप्रसिद्ध पुरुषाचा चरित्रग्रंथ जेव्हा मी वाचायला घेतो, तेव्हा मला असे वाटत असते की, चरित्रविषय झालेल्या पुरुषासंबंधी जे जे साहित्य उपलब्ध आहे ते सर्व पुन्हा एका मुशीत ओतून, लेखकाने त्या पुरुषाचे एक अगदी अभिनव असे दर्शन घडवले असणार. श्री. म. श्री. दीक्षित यांचे 'नेपोलियन' पुस्तक वाचायला घेताना माझी ही अपेक्षा होती. कारण नेपोलियन हा असंख्य पाश्चात्य लेखकांच्या, टीकाकारांच्या आणि नाटककारांच्या चिंतनाचा विषय झालेला आहे, आणि त्याच्या जीवनावर लिहिल्या गेल्या पुस्तकांच्या संख्येचा एक जागतिक उच्चांक आहे.


मराठीमधे नेपोलियन म्हटले की, त्याची 'चक्रवर्ती' ही भलावण आठवलीच पाहिजे, असे एक अत्यंत रसाळ, व्यासंगपूर्ण आणि सुमार लोकप्रिय चरित्र म्हणजे 'सारस्वत'कार कै. वि. ल. भावे यांचे 'चक्रवर्ती नेपोलियन'. 'मनुष्याच्या कार्यमध्ये परमेश्वराने जेवढे अवतार घेतले त्या सर्वांत नेपोलियनचा अवतार विशेष होय,' इतक्या थराला गेलेल्या नेपोलियन-प्रेमातून कै. भावे यांनी चरित्र लिहिले. तरीसुद्धा चरित्र आपणांस नीट साधले नाही असे नमूद करून, दुसऱ्या कुणी पंडिताने गोड रसवंतीने हे चरित्र लिहिले तर, 'निरुद्योगी उद्योगी होतील,' 'आळशांचा आळस बारा वाटा पळून जाईल,' 'संपत्तीचा गर्व वाटणार नाही,' 'नीचांना मान देण्यात खंती वाटेल' अशा सुमारे शंभर सव्वाशे गोष्टी साधतील अशी अपेक्षा कै. वि. ल. भावे यांनी नमूद केली आहे.

कै. वि. ल. भावे यांनी निर्देशित केलेले कार्य श्री. म. श्री. दीक्षित यांच्या मनात रुजले, व त्यांनी नेपोलियन चरित्राचा ध्यास धरून प्रस्तुतचे चरित्र बांधले आहे.

# माणूस
# रंगतरंग स्पर्धा

# स्पर्धा क्रमांक
# दोन

वसंत सरवटे



१



२

## स्पर्धा क्रमांक २ (अ)

वर दोन चित्रे दिली आहेत.
नेहमीप्रमाणे पावसाळ्यातल्या एके दिवशी मुंबईत चिक्कार पाऊस झाला. सगळीकडे पाणीच पाणी होऊन गेलं. सर्व इमारती, रस्ते सर्व पाण्यात बुडून गेले. अन् ह्या महापुरात सापडले श्यामराव.
ते दिसताहेत पहिल्या चित्रात. पाणी अगदी नाकाला लागलंय् त्यांच्या. पुढं काय होणार ?...
पण सुदैवानं पाऊस कमी होतोय्...पाणी ओसरायला लागलंय् अन् दुसऱ्या चित्रात तर ते श्यामरावांच्या जवळजवळ कमरेपर्यंत उतरलंय्.
आता तुम्हाला तिसरं चित्र काढायला सांगितलं तर तुम्ही काय कल्पना कराल ते तुम्ही सांगायचं. तीन चित्रांची मिळून एक हास्यचित्रमाला झाली पाहिजे. म्हणजे शेवटाला काहीतरी गंमतीदार कलाटणी हवी. कल्पना २।३ च वाक्यात लिहून पाठवा.
उदा० मला सुचलेली कल्पना पान ४ वर दिली आहे. तुमची ह्यापेक्षा वेगळी हवी...


स्पर्धा क्रमांक २ (ब)



शेजारच्या पानावरील दहा व्यक्तींना तुम्ही ओळखता. फक्त येथे त्या वेषांतर करून आल्या आहेत. तर त्यांची नावं सांगा पाहू.

नावे पान ४ वर लिहा.

## स्पर्धा क्रमांक २ (क)



प्रख्यात चित्रपटातील हा एक प्रसंग आहे. तुम्हाला कदाचित आठवत असेल. पण ही आठवण विसरून जायची. हे केवळ एक छायाचित्र आहे असं समजायचं अन् त्याखाली एक मजेशीर संवाद लिहायचा.

चित्रातील तीनपैकी कोणतीही व्यक्ती बोलतेय् असं तुम्ही समजू शकता आणि चित्रात दिसणाऱ्या तपशीलाचा (उदाहरणार्थ, दोन व्यक्तींच्या हातात काठी आहे किंवा एकानं नाईट ड्रेस घातलेला आहे तर दुसऱ्यानं बाहेर जायच्या वेळचा पूर्ण पोषाख केला आहे.) तुम्हाला अगदी हवा तसा उपयोग करण्याचं स्वातंत्र्य आहे.

अट एक : संवाद गंभीर नको.

उदाहरणार्थ : मला सुचणारा पर्याय :

"बाबांची ऑफिसला जायची वेळ झाली तरी अजून झोपूनच आहेस?...पास तरी कर व्हायचास् अशानं बाळचा?" ...

स्पर्धा क्रमांक २ (अ) साठी
मला सुचलेला पर्याय असा.



स्पर्धा क्रमांक २ (ब) मधील व्यक्ति :

१. 
२. 
३ 
४. 
५. 
६. 
७. 
८. 
९. 
१०. 

स्पर्धा क्रमांक २ (क) साठी मला सुचलेला पर्याय असा.

स्पर्धकाचे नाव आणि पत्ता

माणूस साप्ताहिक : २६ ऑगस्ट १९७२ : किंमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९

नेपोलियन हे फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य होय असे म्हटले जाते. अपत्य तर खरेच परंतु ते क्रांतीच्या पत्रिकेतील मूळ नक्षत्रावर जन्मलेले अपत्य होते. फ्रेंच जनक्रांतीने राजाराणीचा संहार करून राजेशाहीचा अंत केला. सरंजामदारवर्ग आणि धर्ममार्तंडांचा भिक्षुकवर्ग यांनी सर्व सत्ता हाती केंद्रीत केली होती. या रचनेचा पुरता मोड मात्र या क्रांतीने झाला नाही, माणसे मारून कल्पना मरत नाहीत. म्हणूनच कॉर्सिका बेटावर फ्रान्सच्या सरहद्दीबाहेर जन्मलेल्या बोनापार्टने फ्रान्समध्ये पाऊल टाकताच, त्याच्या कर्तृत्वावर जशी फुंकर बसली, तशीच ती विझत चाललेल्या राजेशाहीच्या प्रेमालाही बसली. इटालीतील मोहीम, इजिप्तमधील मोहीम या लढायातून नेपोलियनचे जे रणशौर्य प्रगट झाले, त्याचा फायदा उठवून नेपोलियनने फ्रान्समध्ये परतताच प्रथम 'फ्रेंच डायरेक्टरी'चाच बळी घेतला. जनतेच्या नावाने राज्य करणारी ही डायरेक्टर मंडळी काही अपवाद वगळता, गलथान आणि विलासी होती; हे खरे असले, तरी त्याच्या जागी चांगली माणसे आणायला हरकत नव्हती. पण नेपोलियन हे करीत नाही. नेपोलियन सर्वसत्ताधारी होऊन राज्यशकटच कबजात घेतो. 'फर्स्ट कॉन्सल' होतो.

ऑस्ट्रियावर स्वारी होते. मारेंगोच्या विजयाच्या धुंदीत, फ्रेंच जनता नेपोलियनला देशाचे तहहयात नेतृत्व बहाल करते. नकळत नेपोलियन एका नव्या विसंगत भूमिकेत प्रवेश करतो. ही भूमिका असते राजेशाही नेस्तनाबूद करणाऱ्या क्रांतिकारकाची ! ही भूमिका पेलावी अशी त्याची मनोभूमिकाच नव्हती. यामुळे इथे तो पहिली चूक करतो.

बोरबॉन घराण्यांपैकी एक राजवंशीय ड्यूक. फ्रान्स सरहद्दीबाहेर आपले दिशाहीन निरुपद्रवी जीवन जगत असतो. या ड्यूक-डी-एनजाईनला नेपोलियन कैद करून पॅरिसला आणतो आणि केवळ तो राजाचा नातलग म्हणून त्याचे डोके मारले जाते. १८०४ च्या सुरुवातीला राजेशाहीवर इतका दांत असलेला नेपोलियन, १८०४ संपण्यापूर्वी २–१२–१८०४ रोजी, पोप महाशयांना पॅरीसला पाचारण करून, स्वतःवर साग्रसंगीत राज्याभिषेक करवून घेतो ! जनरल बोनापार्ट हा फ्रान्सचा बादशहा आणि इटालीचा सम्राट होतो.

नेपोलियनच्या पिंडात जनसत्तेचे बीज कधीच नव्हते. यामुळे तो बादशहा झाला हे त्याच्या मनोधर्माला धरून झाले, तरी त्याचे परिणाम कसकसे झाले, नेपोलियनच्या मानसात त्याने काय वादळे उठवली, याचे दर्शन श्री. दीक्षित यांनी घडवायला हवे होते. 'सिनेटने ठराव करून, व सार्वमत घेऊन नेपोलियनला बादशहापद देऊ केले. २ डिसेंबर १८०४ रोजी नॉगदॅम या प्राचीन धर्ममंदिरात नेपोलियनला मोठ्या थाटामाटाने राज्याभिषेक झाला—' अशा एकदोन ओळीत श्री. दीक्षित हे ही महत्त्वाची घटना ओलांडतात आणि थोडे मागे जाऊन मारेंगोच्या लढाईचे वर्णन करू लागतात.

उटम, ऑस्टरलीज, वाग्राम, लिपगिक, वॉटर्लू या सर्व संग्रामांच्या हकीगती लेखक अतिशय तपशिलवार व रंजक भाषेत देतो. या हकीगती वाचताना वाचक रंगून जातो कारण या संग्रामांतर्गत प्रसंगातून नेपोलियनच्या स्वभावावर प्रकाश टाकणारे लहानमोठे किस्से लेखकाने पेरलेले आहेत. पुस्तकाला वाचक मिळवण्याचे किमान यश लेखकाने यामुळे निश्चित केलेले आहे.

मात्र यामुळेच आपण ' हकीगतनामा ' वाचत आहोत असे वाटत रहाते. ' कोड-डी. नेपोलियन ' हे नेपोलियनने तयार केलेले कायद्याचे पुस्तक. याच्या निर्मितीत अनेक तज्ज्ञांचा वाटा असला तरी ते निर्माण केले नेपोलियनने. भारतात मेकॉले साहेबाने रूढ केलेल्या पीनल् कोडाला मूळ आधार या कोड-डी-नेपोलियनचा आहे. " मी केलेल्या सर्व गोष्टी नाश पावल्या तरी या ग्रंथामुळेच भावी पिढ्यांच्या विद्वान समाजात मला अग्रस्थान मिळेल. " असे या ग्रंथाविषयी नेपोलिनयनेच म्हणून ठेवलेले आहे. परंतु या ग्रंथाच्या निर्मितीची वा सामर्थ्याची सुस्पष्ट दखल श्री. दीक्षित घेत नाहीत.

' धार्मिक शिक्षणाला मुलांच्या शिक्षणात मुळीच थारा नसावा ' असे सांगणारा , कोड-डी-नेपोलियन ' हा संपूर्ण सेक्यूलर ग्रंथ आणि पोपचे देव्हारे माजवणारा नेपोलियन बादशहा यातील विसंगती लेखक दाखवीत नाही, कारण तो फक्त नेपोलियनच्या ' सुसंगत ' लढायांनी भारलेला आहे !

## जीवनकथेला प्राधान्य

श्री. दीक्षितांनी या पुस्तकासाठी पुष्कळ वाचन केले आहे, नेपोलियनविषयक सर्व नव्हे परंतु बरेच ग्रंथ धुंडाळले आहेत, याचा प्रत्यय येतो. मात्र हे करताना नकळत त्यांनी काल हा घटक महत्त्वाचा न मानता, नेपोलियनची जीवनकथाच प्रधान मानली. राजकारणाचा कबजा करणाऱ्या महापुरुषाच्या जीवनाचा वेध घेताना, ते जीवन एकटे भवितव्यता फारशी घडवू शकत नाही, ही गोष्ट लक्षात घ्यावी लागते. काही दशके वा वर्षे, एखाद्या राजकीय प्रणालीच्या अस्तित्वाचे पितृत्व त्या व्यक्तीकडे रहाते हे खरे, परंतु प्रत्यक्ष राजकारणाचा जो व्यवहार घडतो, त्यावर त्याच्या समकालीन दुय्यम तिय्यम दर्जाच्या सहकाऱ्याचे कर्तृत्व परिणाम करीत रहाते. महात्मा गांधींचे चरित्र सांगताना, वल्लभभाई, पंडितजी, आजाद, राजेंद्रप्रसाद, जीना आणि माऊंटबॅटन यांची चरित्रे आणि कर्तृत्व कमी अधिक फरकाने सांगावीच लागतील. नेपोलियाच्या राजकीय व्यवहारात टालेरा, फुशे आदी मंडळींनी केलेली ढवळाढवळ महत्त्वाची होती—दुर्लक्ष करावी अशी खासच नव्हती. लढाई करायची की नाही, कुणाचा काटा काढायचा आणि कुणाची मनधरणी करायची, हे सर्व निर्णय बहुधा भोवतालची मंडळी करीत असतात.

सॉलिसिटी, डोमार्टीन, जनरल मेनो, गुबर्ट, टालेरा, फुशे ही नावे निवेदनात अचानक उगवतात आणि मावळतात. त्यांच्या उपद्व्यापी जीवनाचे आलेख किमान

प्रमाणात दिल्याशिवाय, नेपोलियनशी असलेल्या त्यांच्या संबंधाचे यथार्थ चित्र कसे काढणार ?

नेपोलियनचे खासगी जीवनही रंगेल होते. देझरी, जोसेफाईन, मेरी वालेवास्का, लुईसा, या त्याच्या प्रेमपात्रांनाही त्याचे राजकारण मोठ्या प्रमाणावर ढवळलेले आहे. जोसेफ फूशे हा नेपोलियनचा पोलीस प्रमुख, जोसेफाईनच्या पलंगापर्यन्त पोचलेला होता व नेपोलियनची खासगी पत्रे जोसेफाईन त्याला दाखवीत असे. नेपोलियन इजिप्तची मोहीम अर्धीच टाकून पॅरीसला परतला, ही इतर सर्वांना धक्का देणारी बातमी असली, तरी जोसेफ फूशेला ही गोष्ट सर्वांआधी कळलेली होती. स्टीफन झ्वाईगचे फूशेचे चरित्र या गोष्टी विस्ताराने नोंदवते. नेपोलियनच्या विविध प्रेयसी ठळकपणे चारित्रात वावरल्या असत्या तर अधिक वाचकवर्ग केवळ या बायांनी खेचला असता, इतका मालमसाला त्यांच्या अंतर्गृहात होता. या बायांना श्री. दीक्षितानी इतके दूर का लोटले ?

पुस्तकात नेपोलियनच्या उदयापूर्वीचा युरोपचा राजकीय नकाशा असायला हवा होता. याशिवाय इटलीशी युद्ध करून ऑस्ट्रिया कसा काय नमणार, वाचकांना गूढच रहाणार ! पुस्तकात जी अनेक इंग्रजी अवतरणे आहेत त्यातील असंख्य चुका हा लेखकाचा दोष नाही. परंतु मराठी वाचकांच्या हातात पुस्तक देताना त्या इंग्रजी अवतरणाचा मराठी तर्जुमा द्यायला हवा होता, या पुस्तकाची आणखी एक आवृत्ती वाचक करायला लावतील याबद्दल मला शंका नाही. ही दुसरी आवृत्ती भरपूर नकाशे आणि पृष्टसंख्येचे दडपण न मानता श्री. दीक्षित यांनी चांगली समृद्ध करावी.

लढाया मागून लढाया जिंकीत जाणारा नेपोलियन वॉटर्लूला घायाळ होतो आणि अखेरीस सेंट हेलिना बेटावर जुन्या स्मृतीचे एक उदासवाणे गाणे गुणगुणताना दिसतो. या रण-शार्दूलाच्या नशिबात कोरले गेलेले हे कारुण्यही, श्री. दीक्षितांनी उतरार्धात चांगले उभे केले आहे. त्यांच्या ललित लेखनाचे सर्व गुण इथे प्रकर्षाने जाणवतात.

आज आहे त्या स्वरूपात मात्र, या चरित्र वाचनाने ठसा राहतो तो उजळा मिळालेल्या चक्रवर्ती नेपोलियनचा ! विस्मृतीत जात चाललेल्या चरित्राला उजळा देण्याचे काम केल्याबद्दल श्री. दीक्षितांचे अभिनंदन· □

**नेपोलियन : म. श्री. दीक्षित : केसरी प्रकाशन, पुणे : मूल्य पंधरा रुपये**



# मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल
अनुवाद : अशोक शहाणे

# लेखांक दोन

पण मी काय सांगत होते ?

हो — लेफ्टनंट थींबर्स.. तर लेफ्टनंट थींबर्सच्या आदेशाप्रमाणं आम्ही तिघीजणी त्यांच्या ऑफिसात हजर झालो. मी, लान्सनायक सुभद्रा जयस्वाल न् कॅडेट नमिता सेनगुप्ता.

सुभद्रा माझ्याच वयाची; नमिताताई माझ्यापेक्षा दहाएक वर्षांनी मोठी. लढाईच्या आधी नमितातांई मौलमीनला होती. त्यांच्या नवऱ्याची लाकडाची वखार होती. ब्रह्मदेशातनं शिसवीचं लाकूड कलकत्त्याच्या बाजारपेठेत जायचं. लढाईच्या धामधुमीत धंदा बसला. नवरा-बायको दोघांनीही आझादी फौजेत नाव नोंदवलं. नवऱ्याचं नाव सुविनय सेनगुप्ता. अगदी सुरवातीलाच त्यांची तुकडी आघाडीवर गेली होती. त्यांची तुकडी म्हणजे सुभाष ब्रिगेड. हाकाफालमच्या भागात ते लढले. मधनंमधनं नमितातांईच्या नांवानं पत्रं यायची त्यांची. पत्र आलं की नमितातांई कॅलेंडरवर ती तारीख लाल करून टाकायची.

सुभद्रा माझ्याच वयाची. माझ्यासारखीच अविवाहित. अन तरी तिला सगळे 'भाबीजी' म्हणायचे. आमच्या राणीवहिनीच्या सगळ्याचजणी तिला भाबीजीच म्हणायच्या. एका कुमारिकेला असं अजब नाव काय म्हणून पडलं होतं कुणास ठाऊक! पण ती मात्र अजिबात चिडायची नाही. फार गोड स्वभाव होता तिचा.

शिवाय ही भाबीच आमच्या तुकडीत दिसायला सर्वांत सुंदर होती. सडपातळ बांध्याची. डोक्यावर दाट काळेभोर केस. अन् रंग अगदी मडमेसारखा. अन् सगळ्यांत सुंदर म्हणजे तिचे डोळे. तसंतर आम्ही कुणीच डोळ्यात काजळ घालत नव्हतो. पण काजळ न घालतादेखील तिचे डोळे काजळ घातल्यासारखे दिसायचे. सारखी ती हसत असायची, किंवा गाणं गुणगुणत असायची.

मी एकदा विचारलं होतं तिला, की तुझं हे भाबीजी असं नाव कसं काय पडलं ग ?

सुभद्रा हंसायची. म्हणायची — गांधी ब्रिगेडच्या एका कंपनीत नर्स अशी मी एकटीच होते गं. म्हणून सगळ्या जवानांनी मिळून मला हे नाव ठेवलं. कारण सरळ नाव घेऊन तर काही हाक मारता येत नाही ना. ताई-बिई काहीतरी

जोडावंच लागलं असतं का नाही ? तर त्या सगळ्यांनी गंमत म्हणून 'वहिनी 'च करून टाकलं मला.

मी म्हणायचे — काही म्हण, पण पोरांना टेस्ट आहे बरं का. हे वहिनी नाव अगदी शोभून दिसतं तुला. आता फक्त कुणीतरी एक 'दादा' मिळाला की झालं !

सुभद्रा हंसली की तिचे कुंदकळ्यासारखे दात फार छान दिसायचे. तशी हसत ती म्हणायची — हा दादाच मिळत नाही बघ अजून ! काय नशीब आहे बघ !

मी म्हणायचे — ठीक आहे. ए, मीच मिळवून देते बघ एक दादा तुला!

ती हसून म्हणायची — माहित आहे. तुझ्या गाठीला कसाबसा एकजण आहे ! तो छोटा लाट ! तो देतेस मला ?

ह्या तिच्या प्रश्नाचं उत्तर म्हणून मी एक ठोसा ठेवून द्यायचे तिला.

सरस्वतीबाई अम्माजी विधवा. काही मूलबाळ नाही. नवरा गांधी ब्रिगेडमध्ये सहकारी कमांडर होता. मेजर बी. जे. एस. गढवाल. मलायात गांधी ब्रिगेडच्या ट्रेनिंग कँपमध्ये न् इंफाळच्या मोहिमेच्या सुरवातीला त्यांनी चांगलीच कर्तबगारी दाखवली होती. पालेलच्या विमानतळावर चढाई करण्यात न् तो उध्वस्त करून टाकण्यात त्यांचा मोठा हात होता. मग एका तुरळक चकमकीत ते गायब झाले. लढाई संपल्यानंतर त्यांचं प्रेतपण हाती लागलं नाही. त्यामुळं ह्या निष्ठावान् अम्माजींच्या नवऱ्याचं शेवटचं कार्य झालं नाही. पण अम्माजी पडल्या तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थिनी. प्रगाढ पंडित. दगडासारखा हा आघात त्यांनी शांत चित्तानं सहन केला.

आम्ही तिघीजणी कमांडरच्या खोलीत येऊन हजर झालो.

मिसेस थींबर्सनी आम्हांला बसायला सांगितलं. आयाला बोलावून चहा-बिस्किटांची ऑर्डर दिली. आम्हांला म्हणाल्या — तुम्हाला का बोलावून घेतलंय् हे नक्कीच तुमच्या ध्यानात आलं असेल. आज सकाळीच अखेरचा आदेश आलेला आहे. रंगून पडणार हे अटळ आहे. पण म्हणजे काही लढाई संपली असं नाही. आपलं मुख्य ठाणं रंगूनहून बँकॉकला हलेल एवढच काय ते.

श्वास घेण्याकरता मिसेस थींबर्स क्षणभर थांबल्याबरोबर लगेच लान्सनायक भाबीजी म्हणाली — आम्हांला तर वाटत होतं की आपण इथंच राहिलो तर बरं होईल.

मिसेस थींबर्सच्या कपाळाला आठ्या पडल्या. म्हणाल्या — का म्हणून ? असं काय म्हणून वाटत होतं ?

— आपण इथं राहिलो तर शेवटच्या सैनिकापर्यंत लढाई करता येईल. पण उघडया मैदानावर सुसज्ज सैन्याबरोबर —

लेफ्टनंट थींबर्सनी तिला मधेच थांबवलं. त्या म्हणाल्या --

खुल्या मैदानात उभं राहून रणगाड्यांशी झुंज घ्या असं कोण म्हणतेय् तुम्हांला? आपण फक्त रातोरात माघार घेतोय्. तुम्हांला कुणी रणांगणात आघाडीवर जायला थोडच सांगतंय्!

आम्ही बरोबर नकाशे घेऊनच गेलो होतो. तो टेबलावर पसरून आम्ही आमची बाजू बळकट करत राहिलो. ?

पण परत आम्हांला मधेच थांबवून लेफ्टनंट थींबर्स म्हणाल्या — तुमचा गैरसमज झालाय्. आपल्याला काही पायी जायचं नाहीच. जपानी किफान ऑफिसकडनं आपल्याकरता स्पेशल ट्रेनची व्यवस्था झालीय्.

--स्पेशल ट्रेन ?

आम्ही आश्चर्यानं थक्कच झालो.

आया चार कपबशा, किटली न् एका प्लेटमधे बिस्किटं ठेवून गेली होती.

लेफ्टनंट थींबर्सनी चारी कपात नीट चहा ओतला. दूध न् साखरेची भांडी पुढं सरकवत म्हणाल्या--हेल्प युवरसेल्व्ज.

एक कप स्वत:कडे ओढून घेऊन गप्पा मारत असल्याच्या निवांत सुरात त्या म्हणाल्या--चला तर मग. तुम्हांला सगळंच सांगून टाकते. कारण एवढ्यात बऱ्याच गोष्टी झाल्यायत.

मग लेफ्टनंट थींबर्सच्याकडनं इत्थंभूत हकीगत कळली.

खुद्द नेताजीपण म्हणे रंगून सोडून जायला आधी तयार नव्हते. जीव जाईपर्यंत इथंच लढाई करावी, असं त्यांच्या मनात होतं. किंवा मग पकडलं तर पकडू देत. पण त्यांच्या आजूबाजूच्या लष्करी सल्लागारांनी सांगून सांगून शहर सोडून जायला त्यांना कबूल केलं. जपान सरकार नेताजींच्याकरता एक खास प्लेन पाठवणार होतं. पण विमानानं रंगून सोडायला काही ते तयार होईनात. आपण विमानानं इथनं गेलो, की मग झाशीच्या राणीच्या तुकडीतल्या रंगूनमधल्या ह्या तीनशे मुली नक्कीच शत्रूच्या हाती लागणार--हे त्यांना ठाऊक होतं. पण तसं त्यांना काही केल्या होऊ द्यायचं नव्हतं. म्हणून नेताजींनी जपानी मंत्री हायाइयांच्याकडे निरोप पाठवला--विमानाच्या बदली मला तुम्ही एक ट्रेन द्या. म्हणजे राणीवाहिनीच्या मुलींना बरोबर घेऊनच मी रंगून सोडतो.--ट्रेन द्यायला हायाइया तयार झाले. पण त्यांनी उलटा निरोप पाठवला—की नेताजींनी स्वत: मात्र आपल्या मुख्य सहकाऱ्यांनिशी मोटारीनं रवाना व्हावं, अशी जपान सरकारची इच्छा आहे. त्या मोटारींचा तांडा आज संध्याकाळच्या आतच नेताजींच्या घरासमोर हजर होईल. अन् संध्याकाळी सातला ते निघतील. पाच रेक्स न् एक इंजिन पण तैय्यार असेल साडेसातला. रंगून स्टेशनच्या जवळच्याच लोकोशेडमधे राणीवाहिनीला घेऊन ही गाडी रात्री आठला सुटेल.

ही सूचना नेताजींनी मान्य केली. पण त्यांनीही आणखी एक निरोप धाडला, की संध्याकाळी सातला काही आपल्याला निघता यायचं नाही. रंगून सोडायच्या आधी बरेच महत्त्वाचे आदेश द्यायचेयत. जे इथंच राहणार अहेत त्यांना काही सूचना पण द्याव्या लागतील. त्यामुळं साताऐवजी निघायला नऊ वाजतील. शेवटी परत एकदा नेताजींनी असं पण लिहिलं, की कॉन्व्हॉय घेऊन जो कुणी जपानी अधिकारी आपल्याकडे येणार असेल त्यानं आधी स्टेशनवर चक्कर मारून मगच यावं! झाशीच्या राणीच्या तुकडीला घेऊन जाणारी आगगाडी सुटल्याय् अशी पक्की बातमी आपल्याला रंगून सोडायच्या आधी मिळायला हवी—असंही त्यांनी लिहिलं.

ह्या हायाइया–महाशयांचा आधीचा एक किस्सा आहे. नेताजींचं न् त्यांचं एवढंसं बरं नव्हतं—नाही, बरं नव्हतं वगैरे काही नाही—पण हायाइयांचं निमित्त करून जपान सरकारला नेताजींनी एक धडा शिकवला होता. ते पण सांगून टाकते आत्ताच!

जपानी लोक भलतेच शिस्तीचे भोक्ते. नियम पाळून चालणारे. प्रोटोकोलमधलं एवढंसं काही राह्यलं तर आपली जातच गेल्यासारखं वाटायचं त्यांना. जपानी नोकरशाहीच्या ह्या माशी-टु-माशी वृत्तीचा नेताजींना एकसारखा त्रास होत होता. लढाईत तर प्रत्येक क्षण मोलाचा. पण जपानी प्रोटोकोलच्या भरभक्कम भिंतीमुळं नेताजींच्या उत्साहावर वारंवार विरजण पडायचं.

एकच अगदी लहानसं न् तरी भयंकर उदाहरण देते. बर्लीनहून पाणबुडीतनं टोकियोला जायचा सगळा आराखडा पक्का झाल्यावर अगदी शेवटच्या क्षणी जपान सरकारनं एक नवीनच भानगड उकरून काढली. जपानी नाविक दलाच्या सेनापतींनी कळवलं, की युद्धकाळात कुणाही मुलकी माणसाला जपानी लष्करी जहाजातनं न्यायचा नियम नाही. तर ह्याकरता खास परवानगी लागेल.

जर्मनीतल्या जपानी वकिलानं अगदी संकोचून जाऊन आपल्या देशाची ही हरकत पेश केली.

बॅरन व्हॉन ट्रॉटनं टोकियोला लगेच केबल पाठवली—सुभाषचंद्र बोस हा काही मुलकी माणूस नाही. ते भारतीय मुक्तिसेनेचे कमांडर-इन-चीफ आहेत!

—बस्! ब्युरोक्रॅटिक जपानचं लगेच तेवढ्यावर समाधान झालं!

पण ह्या सगळ्या प्रकाराचा नेताजींनी एक बदला घेतला होता.

रंगूनच्या किफानचे कर्णधार म्हणून हायाइया बदली होऊन आले. ते नेताजींना भेटायला आले. कर्टसी व्हिजिट. हे पण प्रोटोकोलप्रमाणंच. नेताजींच्या सेक्रेटरीने त्यांना मानानं बाजूच्या एका खोलीत बसवलं न् तो नेताजींना सांगायला गेला. जपान सरकारचे प्रतिनिधी न् मंत्री जनरल हायाइया नेताजींच्या भेटीकरता वाट पहातायत म्हणून.

नेताजींनी शांतपणानं त्यांचं परिचयपत्रक पाठवायला सांगितलं.

हाचाइया रागानं लालीलाल झाले. आपण एवढे जपानचे एक मंत्री. आपल्याला तर सगळेच ओळखतात. आपलं कसलं परिचयपत्रक मागतात ?

पण हेही प्रोटोकोलला धरूनच होतं. स्वतंत्र सेनेच्या सरसेनापतींच्यासमोर जो म्हणून कुणी हजर होणार त्याची क्रेडेन्शियल्स आधी तपासली जायला हवीत.

तर हाचाइयासाहेबांनी निरोप पाठवला, की आपण काही परिचयपत्र आणलेलं नाही म्हणून.

नेताजींनीपण तत्काळ उलट निरोप पाठवला – मला वाईट वाटतं, मी आपली भेट घेऊ शकत नाही !

स्वतंत्र जपानच्या प्रतिनिधीला त्या दिवशी परतावं लागलं स्वातंत्र्याकांक्षी भारतीयाच्या दारापाशी येऊन.

तेच हे हाचाइया ! परिस्थितीच्या फेऱ्यात आज त्यांना बदला घ्यायची संधी आल्यासारखंच झालं की ! पण मी तसं तरी कसं म्हणू ? कारण इकडे टोकियोहून हाचाइयांना गुप्त आदेश आला, की रंगून पडायच्या आधीच नेताजींना रंगूनहून हलवा म्हणून. अगदी स्वच्छ शब्दात टोकिओच्या सुप्रीम कमांडनं सांगून टाकलंय की नेताजींच्या सुरक्षिततेची जबाबदारी खुद्द हाचाइयांच्या शिरावर राहील म्हणून. म्हणजे ह्या धांदलीत नेताजींचं काही बरंवाईट झालंच तर जनरल हाचाइयांना कोर्ट-मार्शलमध्ये आरोपी म्हणून उभं रहावं लागणार होतं. त्यामुळं सरळ वागणं हाचाइयांना भागच होतं. नेताजी आपल्या शब्दापास्नं रेसभरपण ढळणार नाहीत हे त्यांना समजून चुकलं होतं. राणीवाहिनीकरता आगगाडीची तजवीज झाली नाही, तर नेताजींना रंगूनमधनं हलवता यायचं नाही. त्यामुळं तशीच तजवीज त्यांना करावी लागली.

हे सगळं तपशीलवार सांगून झाल्यावर लेफ्टनंट थींबर्स म्हणाल्या— आज दुपारी बारा वाजता चीफ-ऑफ-स्टाफ नेताजींच्या वतीनं आपल्याला निरोप देण्याकरता येणारायत. पंधरा मिनटांपेक्षा जास्ती ते थांबतील असं मला तरी काही वाटत नाही.

——तर मग मुलींना सगळं सांगून टाकू ?——मी विचारलं.

——नाही नाही ! तसं असतं तर परेड-ग्राउंडवर मीच सांगितलं असतं की ! ट्रेनची सोय होतेय हे अजून एक मिलिटरी सिक्रेट आहे. आता चीफ-ऑफ-स्टाफनंच स्वतः तशी घोषणा केली तर गोष्ट वेगळी. पण मी ती जबाबदारी घेऊ शकत नाही. कारण तसा काही अधिकार मला दिलेला नाही. तुम्ही मुलींना फक्त एवढंच सांगा – की म्हणावं एका तासाच्या नोटीशीवर रंगून सोडायला सगळ्याजणी तयार रहा.

——पण हे तर आत्ता तुम्हीच नाही का सांगितलंत त्यांना ?

——हो. मी सांगितलंय.

— तर मग आम्हांला बोलावलंत ते कशाकरता ?

आया चहाचे रिकामे कप घेऊन जायला खोलीत आली होती. म्हणून थीवर्स लागलीच काहीच बोलल्या नाहीत.

आया निघून गेल्यावर जानकीदेवी स्वतः उठल्या. त्यांनी दार बंद केलं. त्या परत आल्या. आपल्या खुर्चीवर बसल्या. मग जरासं पुढं झुकून खालच्या आवाजात म्हणाल्या—आणखी एक गुप्त गोष्ट तुम्हांला सांगायची होती. स्ट्रिक्टली कॉन्फिडेन्शियल !

आम्ही कान टवकारले. आम्ही पण पुढं झुकलो.

लेफ्टनंट थीवर्सनी टेबलावरला नेलकटर उचलून हातात घेतला. मान खाली घालून कानशीनं नख घासत-घासत तंद्रीत असल्यासारखं म्हणाल्या—मला माहीत आहे, मी जे सांगणाराय् ते ऐकून तुम्हांला वाईट वाटेल. पण इलाज नाही. ह्या लष्करी आयुष्यात आपल्याला प्रत्येक गोष्टच अंगवळणी पाडावी लागते !

म्हंजे ही निव्वळच प्रस्तावना ! काय म्हणायचंय काय ह्यांना ?

—मला गुप्तपणानं कळवलं गेलंय हे. अन् सावध राह्यला सांगण्यात आलंय. आपल्याच तुकडीत एकजण आहेत ! त्यांच्याबद्दल सतत जागरूक राह्यला हवंय आपल्याला ! अर्थात त्या विश्वासघात करतीलच असं काही कुणी स्पष्ट म्हणत नाहीय. पण ज्याअर्थी वरनं आदेश आलेला आहे त्याअर्थी आपल्याला सावध राह्यलाच हवं ! मुख्य म्हंजे सबंध तुकडीच्याच सुरक्षिततेचा प्रश्न आहे तेव्हा— पण आपल्या वागण्यावरनं त्यांना काही संशय येऊ देता कामा नये. त्यांना विनाकारण धक्का द्यायचा नाहीय आपल्याला. पण—

नमितातार्इंनी मधेच अडवलं—कुणाबद्दल बोलताय तुम्ही हे सगळं ? कुणाबद्दल ?

लेफ्टनंट थीवर्स काहीच न बोलता नख घासत राह्यल्या.

—तुम्ही ज्याअर्थी एकाच बराकीतल्या आम्हा तिघींना बोलवून घेतलंयत, त्याअर्थी आमच्याच अठ्ठेचाळीस जणींच्यापैकी कुणीतरी—

—येस !—थीवर्स ओठातल्या ओठात पुटपुटल्या.

भावीजी म्हणाली, आमच्यापैकी बहुतेकींना तुम्ही काही अहो जाहो म्हणत नाही. एक नमिताताईच तेवढ्या वयानं तुमच्यापेक्षा मोठ्या म्हणून तुम्ही त्यांना 'आप' म्हणता. अर्थात त्यांच्याखेरीज आणखी एक—

तेव्हाशी कुठं मान वर उचलून आमच्याकडे बघूट लेफ्टनंट थीवर्स म्हणाल्या— हो ! सुभद्राचा अंदाज बरोबर आहे ! अम्माजीच ! मिसेस सरस्वतीबाई गढवाल !

—अशक्य !—एकाचवेळी आम्ही तिघीजणी जवळजवळ किंचाळलोच.

मिसेस थीवर्स आवेगानं उठून उभ्या राह्यल्या. गंभीर आवाजात म्हणाल्या— कॉम्रेड्स ! मला जिच्याबद्दल आदरच आहे अशा स्त्रीची बदनामी करण्याइतकी

काही मी हलक्या मनाची नाही ! अन् एकमेकींची निंदानालस्ती करत वेळ घालवावासा वाटायला हे काही महिलामंडळ पण नाही ! जीवनमृत्यूच्या सरहद्दीवर आपण उभ्या आहोत ! अशावेळी माझ्या तोंडून वायफळ गोष्ट निघणार नाही !

ते ठीक आहे हो ! पण म्हणून अम्माजी ! भारदस्त गंभीर ती स्त्री ! नवरा गेल्यावर त्याचं उभ्या जगात कुण्णी कुण्णी नाही !

मिनिटभर आमच्या कुणाच्याच तोंडून काहीच शब्द फुटला नाही.

मग ती भयानक शांतता मोडत मिसेस थीबर्सच परत म्हणाल्या—अम्माजींच्याबद्दल माझ्यापण मनात आदर आहे. त्या गाढया पंडित आहेत म्हणे. चारपाच भाषा त्यांना येतात. स्वभावानंपण फार चांगल्या आहेत. आपल्या आपल्यातच बोलायचं तर माझा काही ह्याच्यावर विश्वास नाही. मला काही हे खरं वाटत नाही. पण तरीसुद्धा हा लष्करी हुकूम आहे. तो आपल्याला पाळायलाच हवा. तशी सावधगिरी आपल्याला बाळगायलाच हवी. आपण होऊन काहीही गुप्त गोष्ट आपण त्यांना सांगायला नको. अन् लांबून त्यांच्यावर नजर ठेवू या. एक सैनिक म्हणून आपल्याला एवढं करणं भागच आहे. पण त्याचबरोबर माणूस म्हणून पण आपलं एक कर्तव्य आहेच ! त्यांचा कोणत्याही प्रकारे अपमान होत नाही एवढी खबरदारी आपण माणूस म्हणून बाळगू या ! तुमचं काय म्हणणं आहे ?

आम्ही सगळ्याच हो म्हणून निघून येत होतो, एवढ्यात लेफ्टनंट थीबर्स म्हणाल्या—आरती, तुझ्याकडे जरा आणखी एक काम आहे माझं.

परत मी बसले बाकीच्या दोघी निघून गेल्या.

—तुझ्यावर एका महत्त्वाच्या कामाची जबाबदारी टाकतेय. आपल्या डिटॅचमेंटची इथनं हलायची सगळी व्यवस्था तुझ्याकडे. आता लगेचच टॅक्सी पकडून तू जनरल पोस्ट ऑफिसमध्ये जा. पोस्टाच्या मोठ्या घड्याळात बरोब्बर नऊ वाजून सात मिनिटं झाली, की तू तारेच्या खिडकीकडे जा. अन् लक्षात ठेव, जीपीओत तारेच्या दोन खिडक्या आहेत. तर तू त्यातल्या इनलँड काउंटरकडे जा. तिथं आपला एक जवान तुला भेटेल.

ड्रावरमधून कागदाचा एक कपटा काढून तो बघत बघत त्या वाचत गेल्या—वय सत्तावीस. वजन एकशे बावन्न पौंड. उंची पाच फूट साडेनऊ इंच. रंग काळा. दाढी नाही. मिशा नाहीत. चष्मा नाही. अंगावर लष्करी गणवेश. रँक लेफ्टनंट.

—नाव ?—मी मधेच विचारलं.

नाव सांगायची परवानगी नाही. त्यांच्या हातात सिंगापूरहून निघणारं इंग्रजी वर्तमानपत्र असेल. ट्रिब्यून. तू सरळ त्याच्याकडे जाऊन त्याला विचारायचंस की हे आमचं वर्तमानपत्र आहे ?—जवान उत्तर देईल—नाही. हे एकोणीस तारखेचं

आहे.—म्हंजे तू धरून चाल, की आपण बरोबर माणूस गाठलाय.
—पण आणखी काहीच पासवर्ड वगैरे नाही ?
—आहे ना. डार्लिंग !
—काय ?
—आत्ताच तर सांगितला ना तुला—डार्लिंग !
—डार्लिंग !
मी भलतीच दचकले. लष्करातला परवलीचा शब्द काय तर म्हणे डार्लिंग !
लेफ्टनंट थीबर्स गंभीरपणानं म्हणाल्या—आय ॲम सॉरी फॉर यू आरती ! पण ह्या लढाईत आपले जवान प्राण ओवाळून टाकतायत अन् लढाईच्या कामाकरता एखाद्या अनोळखी सैनिकाला साधं डार्लिंग म्हणायला तू कचरतेयस !
माझे गाल लाल झाले. अडखळत मी म्हणाले—नाही, तसं नाही...म्हंजे—
त्यांचा गंभीरपणा कायमच होता.
—शिवाय तू इतकी घाबरतेस कशाला ? आणखी कुणाला तू डार्लिंग म्हणतेयस हे काही तुझ्या छोटया लाटला कळायचं नाही.
लाजेनं मला वरपण बघता येईना. मग कशी काय कोणजाणे एकदम शंका आली. चमकून मी मान वर केली. गंभीरपणाच्या मुखवटयाच्या आड तोंडावर रुमाल धरून लेफ्टनंट थीबर्स हसत होत्या. अर्थात एव्हांना मी पण हसतच होते. छोटया लाटबद्दलचं त्यांच्यापर्यंत गेलंय हे मला ठाऊकच नव्हतं.
लेफ्टनंट नाझिर अहमदचं नाव आम्ही राणीवहिनीच्या पोरींनी छोटालाट ठेवलं होतं. आमच्या प्रेमाची गोष्ट आमच्या तुकडीतल्या कितीतरी—जणींना ठाऊक होती. पण खुद्द थीबर्सनापण ती ठाऊक आहे ह्याचा मला पत्ताच नव्हता.
लेफ्टनंट अहमदला आम्ही छोटालाट म्हणायचो त्याच्या मागंपण एक गोष्ट होती. भारताचा काही भाग आपल्या ताब्यात आला, की तिथं एक हंगामी मुलकी सरकार बनवायचं—असा नेताजींचा आदेश होता. स्वराज्य न् शहीद ही बेटं मुक्त केल्यावर मेजर–जनलर लोकनाथच्या नेतृत्वाखाली तिथं लगेच एक हंगामी सरकार बनवलं होतं. मणिपूर आमच्या ताब्यात आलं की मेजर—जनरल ए. सी. चतर्जी तिथले गव्हर्नर होणार होते. मेजर—जनरल चतर्जी म्हंजे एक अत्यंत दक्ष आय–एम–एस ऑफिसर होते. मलायात यायच्या आधी ते बंगालचे पब्लिक हेल्थ डिटेक्टर होते. अन् हा लेफ्टनंट नाझिर अहमद म्हंजे मेजर—जनरल चतर्जींचा एडीकाँग. तेव्हा आमच्या मुलींचं म्हणणं असं की चतर्जी जर का मणिपूरचे बडेलाट होणार, तर नाझिर छोटालाट होणारच. अन् मग मी ह्या छोटया लाटची बायको !
हसू आवरून मी म्हणाले—पुढं ? माझा पासवर्ड झाला डार्लिंग ! अन् त्याचा ?
—स्वीटहार्ट !
आवेगानं मी उठून उभी राह्यले. जानकीताईंनी काय सगळीच थट्टा चालवल्याय्

का काय ? मिलिटरीचे पासवर्ड्स काय असे रोमँटिक असतात का काय कधी ? पण मग ह्यांचं हे काय चाललंय् तरी काय ?

पण लेफ्टनंट थीबर्स एवढंसदेखील हसत नव्हत्या. ओठाच्या कोपऱ्यात तर नाहीच पण त्यांच्या डोळ्यातसुद्धा कुठं थट्टेची काही निशाणी नव्हती. त्या गंभीरपणानं म्हणाल्या—सिट डाउन !

बसले कसली—खुर्चीवर धप्पदिशी पडलेच मी !

—पासवर्ड चेक करून झाल्यावर तू निश्चितपणानं ह्या जवानाबरोबर जाऊ शकतेस. तुला घेऊन पहिल्यांदा तो जाईल जपानी किफानच्या हेडक्वार्टर्सवर. तिथनं सूचना मिळवून तुम्ही स्टेशनवर जायचं. ट्रेन काही बहुतेक स्टेशनवर लागायची नाही. सार्यांडिंगलाच कुठनं तरी आपल्याला गाडीत चढावं लागेल. ब्लॅकआौटमध्ये रात्री लाख धुंडाळूनपण काही सापडायचं नाही. तर तू सगळं बघून घेऊन ये. म्हंजे गाडी कुठं लागणार, किती रेक्स आहेत, त्यांचे नंबर काय वगैरे सगळं. अन् काही प्रसंगानं मला फोन करायला पाह्यजे असं तुला वाटलं, तरी स्वतःची ओळख देऊ नकोस. फक्त पासवर्डच तेवढा सांग. अन् गाडीबद्दल फोनवर एक अक्षरपण काढू नकोस ! ही ट्रेन मूवमेंट म्हंजे अजून टॉप मिलिटरी सिक्रेट आहे.

—पण इतकी सावधगिरी बाळगायचं खरंच काही कारण आहे का ?—मी विचारलं.

लेफ्टनंट थीबर्स गालातल्या—गालात हसल्या. म्हणाल्या—They are not to reason why, they are not but to do and die !

तो पर्यंत मी उठून उभी.

मग मिसेस थीबर्स आपण होऊनच म्हणाल्या—तशी काही जरूर नसेल तर इतकी खबरदारी आपण कशाला ठेवली असती ग ! पण ब्रिटिशांचे हेर शहरात घुसलेयत. म्हणून तर आज अचानक अम्माजींच्यावर नजर ठेवायचा हा हुकूम झाला ना ?

परत अम्माजींचा विषय निघाल्यामुळं माझं मन उदास होऊन गेलं. अम्माजींच्याबद्दल मला निव्वळच आदर नव्हता. प्रेमपण होतं. तशातर रुक्मिणीताईपण विधवा आहेतच की. पण त्या मांस-मच्छी सगळं खातात. अम्माजी निष्ठावान् आहेत ! त्या मांसमच्छीला शिवतपण नाहीत. तपश्चर्या करत असल्यासारख्या राहतात त्या.

मी निघून जात होते एवढ्यात मिसेस थीबर्सनी काही ब्रह्मी नोटा दिल्या. म्हणाल्या—टॅक्सीचं भाडं. दुपारी बाहेरचं जेवण करून घे. अर्थात् त्याच्याकरता तुला काही पैसे खर्चायला नकोत—

—का ते ?—मला आश्चर्यच वाटलं.

—सत्तावीस वर्षांचा फौजी जवान असा गोड पासवर्ड ऐकल्यावर तुला लंचदेखील देणार नाही का ?

आता मात्र मला जवळपास रागच आला होता. मी सॅल्यूट ठोकला. न् भराभरा बाहेर आले. भावीजी न् नमिनाताईंच्याबरोबर अम्माजींच्याबद्दल बोलायचं मनात होतं. पण इतकी फुरसतच नव्हती. अम्माजींचं वय पंचेचाळीस. केस पिकायला लागलेले. त्यांचा नवरा मेजर गढवाल. एका बटालियनचे सहकारी कमांडर होते. इतक्या जबाबदारीच्या जागेवर असूनदेखील आमनेसामने लढाईत त्यांनी आपले प्राण वेचले होते. अन् तरी त्यांच्या विधवा बायकोबद्दलच संशय ! त्या म्हणे विश्वासघात करायची शक्यता आहे ! ही 'जानवान्' पोरं काही म्हणता काही कामाची नाहीत. सबंध इंटलिजन्स ब्रँचच नव्यानं तयार केली पाहिजे. पण भावीजी किंवा नमिनाताईंना भेटायइतका वेळ आत्ता नाही.

बराकीत जाऊन तयार होण्यात थोडा वेळ गेला माझा. कसली तयारी न् कसलं काय म्हणा ! साडी बदलणं नाही की काही नट्टापट्टा नाही. नेहमीप्रमाणं लष्करी पोशाख तर भल्या पहाटेच अंगावर चढवून ठेवलायच की.

बरोब्बर नऊ वाजून पाच मिनटांनी मी जनरल पोस्ट ऑफिसपाशी पोचले. टॅक्सीचं भाडं देऊन पायऱ्या चढून वर येण्यातच आणखी दोन मिनटं गेली. उजव्या हाताच्या तारेच्या काउंटरकडं मी वळले. खाकी गणवेश घातलेला एक सैनिक काउंटरकडे पाठ करून काउंटरला टेकून उभा होता. हातात सिंगापूरचं एक इंग्रजी वर्तमानपत्र. ट्रिब्यून. वर्तमानपत्र उघडून त्यानं समोर धरलेलं. वाचतोय् वाटतं. जवळपास कुणी नसलं तरी तारेच्या काउंटरवर लांबलचक रांग होती. जवानाचं तोंड वर्तमानपत्राआड लपलेलं. दाढी-मिशा-चष्मा आहे का नाही कळायला काही मार्ग नाही. खांद्यावरचा बॅज मात्र दिसतोय् दोन समांतर रेघा न् खाली INA. म्हणजे रँक बरोबर जुळतेय्. फर्स्ट लेफ्टनंट. उंची, वजन, वय ह्यांचा मात्र काहीच अंदाज लागत नाहीय्.

तरीदेखील धिटाईनं मी त्याच्याचकडे गेले. विचारलं—हे वर्तमानपत्र आजचं आहे का हो ?

तोंडासमोरनं वर्तमानपत्र बाजूला न घेताच तो म्हणाला—नो डार्लिंग !

मी दचकले. म्हंजे हा नाही तो ! त्यानं म्हणायचं होतं—नाही. एकोणीस तारखेचं.

शिवाय 'डार्लिंग' माझा पासवर्ड आहे. त्याचा नाही.

झटकन् एकदा सभोवार नजर फिरवली. पण नाही.आणखी कुणीच आझाद हिंद सेनेचा सैनिक आसपास कुठं दिसला नाही. मग ? हा माणूस काय गुप्तहेर वगैरे आहे का काय ? पुरता संकेत ह्याला ठाऊक नाहीय्. निव्वळ स्थळकाळ तेवढंच ठाऊक आहे. म्हंजे ? लेफ्टनंट थीबर्सचे खबरदारीचे शब्द आठवले—रंगूनमध्ये ब्रिटिश गुप्तहेर फिरतायत.

तरी भीत-भीत परत एकदा विचारलं—वर्तमानपत्र आहे हे ?

तरी त्यानं तोंडावरनं वर्तमानपत्र काढलं नाही. म्हणाला—आय डोंट नो स्वीटहार्ट !

माझे हातपाय गारठल्यासारखे झाले. 'एकोणीस एप्रिल' म्हणायचा संकेत ह्याला नक्कीच ठाऊक नाहीय्. पासवर्डस ऐकलेय्त. पण कोणता कुणाचा हे पण ठाऊक नाहीय्. नक्कीच हा गुप्तहेर आहे. माझ्याकरता जाळं पसरून बसलाय्. म्हणूनच तर तोंड दाखवत नाहीय्. तोंडासमोर वर्तमानमत्र धरून ठेवलंय्.

मी माघारी फिरायला लागले एवढ्यात त्यानं वर्तमानपत्र फेकून देऊन माझ्या डाव्या हाताचं मनगूट पकडलं. तत्काळ मी बंदूक रोखायला लागले. तर हा आपला खो खो हसायलाच लागला.

—तू ?—मी दगडी पुतळी बनले.

—हो मीच. पण तू तुझा पासवर्ड म्हटला नाहीस तो कुठं !

—तू कधी आलास रंगूनला ? अन् कुठनं आलास ?

—काल रात्री आलो. प्रोमहून. पण आता इथं थांबायला नको. चल ये.

मेजर-जनरल चतर्जींची बटालियपण रंगूनला परतल्याय् अशी काहीच बातमी मला नव्हती. नाझिर अहमदचा हात हातात धरून जनरल पोस्ट ऑफिसमधनं बाहेर पडले.

सेव्हिंग्ज बँक काउंटरवर भयंकर गर्दी. लोक पैसे काढतायत. रंगूनचा पाडाव तोंडाशी आलेला. जो काही पैसाअडका असेल तो घेऊन जो-तो पळून जातोय्.

अहमदनंच सांगितलं सगळं. जनरल चत्तर्जींना थींबर्स काल रात्रीच भेटल्या होत्या. आगगाडीची व्यवस्था बघायला नाझिरच येणाराय् हे त्यांना पक्कं ठाऊक होतं. म्हणूनच सगळ्याच्यांतनं निवडून त्यांनी मलाच ह्या कामगिरीवर पाठवलं. अन् पासवर्ड पण थींबर्सनी स्वतःच तयार केले होते. नाझिरला ते त्यांनीच सांगितले होते. अन् अगदी गंभीरपणा शाबूत ठेवूनच सांगितले होते. राणीवाहिनींतनं कोण सैनिक येणार हे जरी त्यांनी नाझिरला सांगितलं नव्हतं, तरी त्यांच्या अति-गांभीर्यावरनं मीच येणार हे बरोब्बर ताडलं होतं.

[ क्रमशः ]

## मध्यंतर

# ' प्रेषिताचे पाय मातीचे '

## ' गॉसिप ग्रूप 'चे नवे अपयशी नाटक

पुष्पा भावे

पार्ले येथील ' लोकमान्य सेवा संघा 'ची उपशाखा म्हणून कार्य करणारा ' गॉसिप ग्रूप ' गेले वर्षभर फार जाणीवपूर्वक कार्य करीत आहे. ' Men without Shadows ' सारखे, सादर करायला अत्यंत अवघड असे नाटक त्यांनी काही महिन्यापूर्वी सादर केले होते. या महिन्यात ऑस्कर वाइल्डच्या ' सलोम ' या नाटकाचे श्री. पद्माकर गोवईकरकृत ' प्रेषिताचे पाय मातीचे ' हे रूपांतर श्री. विजय बोंद्रे यांनी सादर केले.

' लोकमान्य सेवा संघा 'चे पु. ल. देशपांडे सभागृह हे नाटचगृह नाही. तरी दर्शनी पडदा टाकून छोटचा रगमंचावर हे नाटक सादर करण्यात आले. परंतु नाटचगृहाला अपेक्षित अशी ध्वनियोजना नसल्यामुळे शब्दोच्चार, ध्वनिक्षेपकांची रचना याकडे विशेष लक्ष पुरवणे अत्यावश्यक होते. प्रत्यक्षात तिसऱ्या रांगेतही संवाद ऐकू येत नव्हते. प्रायोगिक, आकांक्षी नाटचसंचाने नाटचकृती सादर करताना प्रयोगाच्या सफाईकडे यापेक्षा अधिक लक्ष पुरवावयास हवे. ' सलोम ' सारखे नाटक निवडताना तो केवळ नेपथ्य, वेषभूषा यांच्या आधारे खुलविण्याचा प्रयोग नाही, याचीही पुरेशी जाणीव दिग्दर्शकाला दिसली नाही. शब्दामागचा भाव जाणून न घेता ज्या यांत्रिकपणे संवाद म्हटले जात होते त्यामुळे गंभीर काव्यात्म संवाद हास्यास्पद होत होते. महाराणी व राजकन्या या दोन्ही स्त्रीपात्रातून स्त्रीत्वाचे भयावह रूप व्यक्त व्हावयास हवे होते. पात्रयोजनेच्यावेळी याचा विचार केलेला नव्हता आणि अभिनयातूनही सौ. टिळक व कु. जोशी यांनी तसा काहीच प्रयत्न केला नाही. त्यामुळे ' मी तुझ्या चेहेऱ्याचं चुंबन घेईन, बुद्धिभास्कर. ' यासारखे महत्त्वपूर्ण वाक्य सपाट वाटत होते. महाराजाची भूमिका करणारे श्री. आपटे राजकन्येकडे पाहताना आपली नजर बदलू शकत नव्हते, अभिलाषेचे सूत्र केवळ शब्दातच राहिले. बुद्धिभास्कराची भूमिका करणाऱ्या श्री. शेंडे यांना आवाजाची,

रूपाची देणगी असली तरी त्यांचे सारे संवाद फार एकसुरी, क्वचित् कर्कशही, वाटत होते.

श्री. चंदन पेठकर यांनी उभारलेले नेपथ्य व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेली प्रकाशयोजना नाट्यवस्तूला व प्रयोगाला अनुकूल होत्या. परंतु वेषभूषा मात्र अतार्किक वाटली. महाराणी पौराणिक नाटकातील सत्यभामेसारख्या दिसत होत्या. (त्यांच्या अभिनयाची पातळीही तीच होती.) तर राजकन्या भरतनाट्यम् शैली-नृत्य करणाऱ्या नर्तिकेसारखी दिसत होती.

'सलोम' नाटकाच्या कथाबीजाच्या व रचनेच्या दृष्टिकोनातून त्यातील नृत्याला विशेष महत्त्व आहे. ते प्रत्यक्ष रंगमंचावर दाखवणे आवश्यक होते. आणि हे नृत्य अशास्त्रीय असणे आवश्यक होते. (श्री. बोंद्रे यांनी फार चातुर्याने नृत्याच्या प्रारंभापाशी अंक संपवला आहे.)

श्री. पद्माकर गोवईकर यांनी 'सलोम' चे रूपांतर करीत असताना भारतीय संदर्भ देण्याचा केलेला यत्न संपूर्णत: फसलेला आहे. 'प्रेषित' ही कल्पना कोठेही उभी राहूच शकत नाही. एकूण 'प्रेषिताचे पाय मातीचे' या नाटकाचा प्रयोग पाहताना आलेला अनुभव संपूर्ण निराशेचा होता. वाईट वाटले ते अशासाठी की एवढा पैसा, एवढे मनुष्यबळ 'गॉसिप ग्रूप'ने वाया का घालवले? एखादा नवा प्रयोग करताना येणारे अपयश यशापेक्षाही महत्त्वाचे असते. परंतु 'सलोम'चे रूपांतर (तेही विशेष चांगले नसलेले) सादर करताना आलेल्या या अपयशातून 'गॉसिप ग्रूप'च्या हाती आले ते निव्वळ अपयश–त्यातून शिकण्यासारखे काही नाही. असलेच तर इतकेच की पुढील प्रयोगासाठी नाटक काळजीपूर्वक निवडावे आणि कोणत्याही प्रयोगापूर्वी आपल्या नटसंचाला शब्दोच्चार व आवाज बाजीचे थोडे अधिक शिक्षण द्यावे. (पुढील प्रयोगापासून 'गॉसिप ग्रूप'ने प्रयोग वेळेवर सुरू न करण्याची परंपरा मोडावी हेही बरे).

प्रारंभी क्षुल्लक वाटणारे हे दोषच नकळतपणे एखाद्या प्रायोगिक नाट्यसंस्थेचे उत्सवी नाट्यसंस्थेत रूपांतर करीत असतात एवढेच श्री. बोंद्रे व त्यांच्या सह-काऱ्यांनी ध्यानी धरावे. ◻

# ३६५ दिवस

## एक आगळा नाट्याविष्कार

मध्ययुगीन युद्धातील शौर्याच्या, वीरोचित मरणाच्या कल्पना आजच्या काळा-तील यांत्रिक युद्धात कधीच नाहिश्या झाल्या आहेत. विशेषत: ज्या कोवळ्या पोरांना राष्ट्र सक्तीने ३६५ दिवस व्हिएतनाम युद्धातील कायदेशीर युद्धपापात सहभागी व्हायला लावते, त्यांच्यादृष्टीने परक्या भूमीवरील मृत्यू हा राष्ट्राने

त्यांच्यावर उगवलेला सूड असतो. हे ३६५ दिवस, जगण्याचा आटोकाट यत्न करून आपल्या आवडीच्या व्यवसायाकडे परत जायचे एवढीच इच्छा मनी धरून नाइलाजाने युद्धभूमीवर जाणाऱ्या मुलांचे अनुभव डॉ. रोनाल्ड ग्लॅसर यांनी '३६५ दिवस' या आपल्या पुस्तकात एकत्र केले आहेत. हा अनुभव आजच्या अमेरिकन तरुणांच्या प्रक्षोभाचे केंद्र आहे. त्यामुळे यंदाच्या, केनेडी केंद्रावर होणाऱ्या नाटयोत्सवासाठी मिनोसोटा विद्यापीठाने वरील ग्रंथ नाटयरूपाने सादर केला.

या नाटयप्रयोगाचा विशेष असा की प्रेक्षकांना काहीही पटविण्याचा यत्न न करता, कोणालाही जबाबदार न धरता, कमीतकमी संवादांचा वापर करून हा सादर केला गेला. परंतु निरर्थक मृत्यू, शारीरिक विद्रूपता यांना सामोरे जाणाऱ्या, स्वतःच्या निष्ठांविरुद्ध रणभूमीवर जाणाऱ्या कोवळ्या मुलांच्या दर्शनातून, मूक-नाटयाच्या परिणामकारक योजनेतून हा प्रयोग उभा राहिला. कोणत्याही प्रकारची वास्तववादी वेषभूषा न करता जर्सी व जिन्स् घालून रिकाम्या रंगमंचावर हा प्रयोग करण्यात आला.

हा नाटयप्रयोग म्हणजे अमेरिकेच्या विवेकबुद्धीला विचारलेला प्रश्न होता. संथ लयीमध्ये सादर केलेले हे नाटक अनेक मोर्च्यांपेक्षा परिणामकारक झाले. त्यातील 'तुम्ही दोषी आहात असे आम्ही ठरवलेले नाही' हे गाणे वा 'मला एकटे घरी जायचे नाही' ही कल्पना नाटकातील अल्पोक्तीतून निर्माण होणाऱ्या कारुण्याचे तीव्र स्वरूप सुचवितात.

३६५ दिवसांचा खेळ पुरा करून शकलेल्या हजारो तरुणांची शोकांतिका या विद्यापीठीय रंगभूमीने अमेरिकन प्रेक्षकांसमोर सादर केली. त्याचा योग्य तो परिणाम झालाच. तरुणांच्या प्रतिक्रिया, त्यांचे प्रक्षोभ यांतून नवी पाश्चात्य रंगभूमी आकाराला येते आहे ती अशी ! तरुणांना स्वतःचा रंगमंच असणे, त्यांनी स्वतःचे अनुभव स्वतः आविष्कृत करणे, यातूनच पाश्चात्य रंगभूमीचे चैतन्य व तारुण्य जपले गेले आहे.

□

# परीक्षण

## नाटय व चित्रपट समीक्षेचे नवे मासिक

नाटक व चित्रपट या माध्यमांचा वेगळेपणा जाणून गंभीर समीक्षणे करणाऱ्या मासिकाची आज अत्यंत गरज आहे. रंगभूमी व चित्रपटसृष्टी यातील चैतन्य लक्षात घेता अशा मासिकांना विषय वा वृत्त यांची कमतरता भासणार नाही. जुलै

महिन्यात मुंबईत अशा एका मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. इंग्रजीत प्रसिद्ध होणाऱ्या या मासिकाचे नाव आहे– 'परीक्षण'. अठ्ठावीस पानी अंकामध्ये श्री. टिकेकरांचा सेन्सॉरवरील दोन पानी लेख वजा करता सारा मजकूर वृत्तवजा, म्हणजेच वृत्तपत्रीय सदरांपेक्षा वेगळे स्वरूप नसलेला असा आहे.

संपादकाने (श्री. सुधीर नाफडे) संपादकीय टिपणात 'The purpose of bringing out this monthly devoted to drama and film criticism is to create a new forum which will reflect the views and opinions of all those who take these art forms a little seriously.' असे म्हटले आहे. 'परीक्षण'च्या पहिल्या अंकाकडे नजर टाकता कलामाध्यमसापेक्ष समीक्षा तर दिसत नाहीच, परंतु या संपूर्ण मासिकाचा सूर इतका उद्धट, व्यक्तिगत टवाळीचा आहे, की त्यामुळे कोणीही प्रामाणिक व रसिक समीक्षक या मासिकापासून दूर राहील. उदा. 'बेकेट'च्या वाचनाचे परीक्षण व श्री. अशोक साठे यांजविषयीचा उल्लेख याचा संबंध काय ? सौ. मेहतांवर केलेल्या अनेक आरोपांना पुरावा काय ? आणि या व्यक्तिगत टवाळीच्या धुळवडीतून ही मंडळी गंभीर समीक्षेकडे पोचणार कशी व कधी ?

'हयवदन'सारख्या महत्त्वाच्या नाटकावरच्या समीक्षेचे स्वरूप, कथानकाचा सारांश व नंतर दोन-चार शेरे असे का ? रंगभूमीवरील संकेताप्रमाणे सूत्रधार मध्यभागी उभा राहतो हा शोध समीक्षकाने कसा लावला ? 'अनुभव'चे परीक्षण वाचताना ते चित्रपटाचे आहे की कादंबरीचे असा प्रश्न निर्माण होतो इतके ते आविष्कारमाध्यमाची जाणीव बाळगणारे आहे !

रंगभूमीला वाहिलेली मासिके महाराष्ट्रात फार वर्षांपासून निर्माण होत आहेत व नाहीशी होत आहेत. अशाप्रकारचे प्रयत्न केवळ उत्साहाने वा हौसेने जगवता येणार नाहीत. त्यामागे कार्यक्षम यंत्रणा, आविष्कारमाध्यमाची समज नसेल तर अशा मासिकाचे प्रयोजन साध्य होणार नाही. आणि हो–इंग्रजीतून मासिक चालवायला सुसह्य इंग्रजी लिहिता यावे लागेल.

[ Pareekshan : Vol I. July 72 ]

अरुणा अंतरकर

# कॉन्फिडन्स दाय नेम इज शत्रुघ्न

तुम्हाला माहीत आहे, भारतात खऱ्या अर्थी नट या गेल्या चार-पाच वर्षातच निर्माण झाले ? आणि हे तुम्हाला माहीत आहे की नाही, की आजवर या दुर्दैवी भूमीत फक्त ५ टक्के खरे 'ॲक्टर' होते आणि उरलेले ९५ टक्के बेगडी 'स्टार्स!' हे सगळे तुम्हाला माहीत नसेल, तर जुन्या नटांच्या कामात आत्मविश्वास नसायचा, 'हिट अँड मिस्' या बाळबोध पद्धतीनं ते अभिनय शिकायचे, त्यांचा अभिनय–अभिनय म्हणजे तरी काय असायचा, तर विचित्र लकबी आणि हातवारे; त्यांना व्यक्तिरेखा कधी उभ्या करताच आल्या नाहीत, हे तरी तुम्हा पामरांना कुठून ठाऊक असणार ?

मला तरी हे अगाध ज्ञान कुठून झालं ? अहो, चित्रसृष्टीत सध्या शत्रुघ्न सिन्हा नामक पुरुषसिंह अवतरला आहे (होय ! तोच तो 'रेप स्पेशालिस्ट' मर्द–पड्यावरचा ! ) ना ? त्याने सर्वप्रथम हे अगाध ज्ञान मुंबईच्या 'जाय सीज'च्या सायन शाखेत अज्ञ प्रेक्षकांपर्यंत पोचवले.

ह्या महा(खल)पुरुषाच्या म्हणण्याप्रमाणे, पुण्यनगरीतल्या 'फिल्म इन्स्टिटयूट'-मधल्या शिक्षणानं त्याच्यासारखे नव्या पिढीतले हिरे चित्रसृष्टीला दिले बरे.

शत्रुघ्ना, (चित्रसृष्टीतली काही काही माणसं या ज्ञात्या पुरुषाला 'चक्करघन' का म्हणतात, देव जाणे ! ) बरं झालं बाबा हे सांगितलंस ! आम्ही आपले वेडे-बागडे चित्रशौकिन. आत्तापर्यंत आम्ही मीनाकुमारी, वहीदा, नर्गीस, दिलीप, राज, राजकुमार आणि बलराज सहानी यांना अभिनयकलेची जिवंत पुस्तकं समजायचो! अशोककुमार, मोतीलाल, रेहमान, गुरू दत्त...अरेरे ! एकेक नावाबरोबर डोळे जमीन धुंडतायत.. तर या सगळ्या बच्च्यांना नैसर्गिक, आत्मविश्वासपूर्ण अभिनय येतो, असं आम्ही धरून चाललो होतो. इतकं मागं कशाला जा ? 'आनंद'मध्ये डॉक्टराची भूमिका जगणारा तो तुझ्या पिढीतला अमिताभ बच्चन. तोसुद्धा फिल्म इन्स्टिटयूटचा नसल्यामुळे आम्ही त्याला आता 'ॲक्टर्स'च्या क्लासमधून हद्दपार केलंय्.

ॲक्टिंग करतायत खुळे ! अरे 'कॉन्फिडन्स–कॉन्फिडन्स' म्हणजे काय याचे घडे चक्कर–चुकलं, शत्रुघ्न सिन्हाच्या पायाशी बसून घ्या. 'कॉन्फिडन्स, दाय नेम इज शत्रुघ्न सिन्हा !' असं त्या सभेत शत्रुघ्नानं ठणकावून सांगितलं, तेव्हा वातावरणात नवी जागृती आली म्हणे. असाच एक आणखी कुणीतरी वाद घालण्याची हौस असलेला (लोक याला उगीच जाणकार समजतात बरं का) म्हणाला, 'मॅनरिझम्स फक्त जुन्या नटांचे असतात वाटतं ? 'मेरे अपने'त हा चक्करघन सदा शर्टाच्या आतून, गळ्यावरून हात फिरवतो, मधूनमधून आकाश न्याहाळतो, ते मॅनरिझम्स नव्हते वाटतं ?'

'नव्हेत रे बाबा !' शत्रुघ्नच्या दणक्यानं (म्हणजे भाषणानं !) प्रभावित झालेला उत्तरला, 'अरे, ती होती फिल्म इन्स्टिटयूट'मध्ये शिकवलेली मेथॉडिक ॲक्टिंग–पॉवरफुल, बोल्ड अँड अँड... '

ह्या गृहस्थाला इंग्रजी जास्त येत नव्हतं म्हणून बरं ! एरवी आणखी एक भाषण ऐकायचा प्रसंग येऊन ठेपला असता. पण आपला मुद्दा न सोडता तो पहिला (नाठाळ, हट्टी कुठला !) म्हणतच राहिला, 'दो राहा, चेतना, खिलौना, गॅम्बलर, गंगा तेरा पानो अमृत वगैरे चित्रपटात तर सगळीकडे शत्रुघ्नाचीच छाप आहे. तेच ते ठाशीव बोलणं आणि नजर फेकणं ! तिथं व्यक्तिरेखा तरी कुठं आहेत आणि 'ॲक्टर' तरी कुठे दिसतो ?'

मंडळी, ह्या हट्टी माणसाचं म्हणणं तुम्ही काही ऐकू नका. 'जुन्या नटांची पिढी स्वतःच्या मनगटांवर उभी राहिली, दोन–दोन दशकं गाजवण्याचं सामर्थ्य त्यांच्यात होतं, आपली 'रंगेल कृत्यं' स्वतःपाशीच ठेवण्याची अक्कल त्यांना होती, त्यांचा पब्लिसिटीसाठी उपयोग त्यांनी केला नाही' वगैरे बरीच बाष्कळ बडबड तो तावातावानं करीत होता. 'हा नवा पोरगा आगाऊ आहे; दारूपेक्षा यशाची नशा डोक्यापर्यंत जाते' असंही काही तो बडबडत होता. पण शत्रुघ्न सिन्हा ते ऐकायला कुठं हजर होता ? तो दिलीप, अशोक, राज, वहिदा इत्यादी मंडळींची 'फिल्म इन्स्टिटयूट'मधल्या ॲक्टिंग कोर्ससाठी मन वळवण्यासाठी गेल्याचं समजलं.

शाब्बास रे पठ्ठे शत्रुघ्न ! सध्या 'व्हिलनी'वरून नायकपदावर तुझी वढती झाल्याचं कळतं. अशीच तरक्की करीत तू अगदी लवकरच महमूदची 'द ग्रेटेस्ट कॉमेडियन' ही पदवी पळवणार यात शंका नाही. (तुलाच भिऊन तो बंगलोरला रवाना झालाय् म्हणे !) □

## वहीदा रेहमान म्हणते....

'अगदी खरं सांगायचं तर या वर्षीच्या बर्लिन–फिल्म फेस्टिव्हलमध्ये एक–अक्षरक्षः एकही चांगला चित्रपट पहायला मिळाला नाही !' चित्रसृष्टीला न शोभेलशा

निर्भयपणानं आणि सोप्या शब्दात वहिदा रेहमानने नुकत्याच एका मुलाखतीत बेलाशक हे विधान केलं. वहिदा मला आवडते ती या दिलखुलास स्वभावामुळेच. 'न्यू वेव्ह (की न्यूड वेव्ह ?), पॅरलल फिल्मस्, 'बोल्ड अॅप्रोच, रिअॅलिझम '–हे शब्द पेरल्याशिवाय ती अगदी सहज, सुबोध मुलाखती देते. आपली बरी वाईट मतं व्यक्त करायला ती कधी कचरत नाही. मागं ती रशियाहून परतली तेव्हा कुणीतरी विचारलं, 'तिथलं लाइफ अगदी वेगळं, अगदी फॅसिनेटिंग असेल नाही ?'

'लाइफ ते वेगळं काय असायचंय् ?' वहिदानं प्रतिप्रश्न केला. 'तिथल्या लोकांना रेशनसाठी आपल्यासारखीच रांग लावावी लागते, आणि काम करावं तेव्हाच त्यांनाही पैसे मिळतात.'

मुद्दा पटवण्याच्या नादात विषयांतर झालं. तर आपण यंदाच्या बर्लिन फिल्म फेस्टिव्हलबद्दल बोलत होतो. 'गोल्डन बीअर' हे पारितोषिक पटकवणाऱ्या 'द कॅंटरबरी टेल्स' मधून तर मधून उठून जायचा मोह आपण मुष्किलीनं टाळला, असं वहिदा पुढं सांगते.

यावरून सिद्ध काय होतं ? चित्रसृष्टीतली नवी मंडळी म्हणतील, वहिदा कले-बाबत अजून अज्ञाण आहे हेच खरं ! कोणत्याही फॉरिन फेस्टिव्हलहून आलं की आपल्या चित्रव्यवसावर झोड उठवीत तिकडच्या चित्रपटांची–मग भले ते न का समजोत ! पण तारीफ करायची असते, हे आजवर अनेक चित्रमहोत्सवांना हजर राहूनही हिला कळलेलं नाही. आपण ज्या खुर्चीवर बसून चित्रपट पहातो ती थिएटरची नसून 'क्रिटिक'ची आहे, हेही हिच्या ध्यानात रहात नाही. सामान्य प्रेक्षकाप्रमाणे खुल्लम खुल्ला मतप्रदर्शन करायचं म्हणजे काय ? ¤

---

## जाहिरात

'शहाजहाननं मुमताजसाठी ताजमहाल उभारला. कमाल अमरोहीनं मीनाकुमारीसाठी 'पाकीजा' घडवला. ('पाकीजा'–रौप्यमहोत्सव प्रसंगाची एक अफलातून जाहिरात)

–फरक एवढाच, पहिली कबर पत्नीच्या मृत्यूनंतर बांधली गेली !

¤

'महमूदच्या बाललीला पहा आणि पोटभर हसा !'– मस्ताना चित्र-पटाची जाहिरात.

–विनोदी नटाची शोकांतिका यालाच म्हणतात का हो ?

---

# क्रीडांगण

## इंग्लंडच्या संघाला दुय्यम समजू नका !

मुकुंद मणूरकर

इंग्लंड-ऑस्ट्रेलिया यांच्यातील अ‍ॅशेसची लढत संपली. दोघांनी प्रत्येकी दोन सामने जिकल्यामुळे मालिका बरोबरीत सुटली. पण 'अ‍ॅशेस' इंग्लंडकडेच राहिल्या. आता वेध लागले आहेत इंग्लंड-भारत यांच्या लढतीचे !

इंग्लंडचा संघ निवडण्यापूर्वीच काही 'नामवंत' खेळाडूंनी भारताच्या दौऱ्यावर जाण्यास आपली असमर्थता व्यक्त केली. प्रथम कर्णधार इलींगवर्थने सूतोवाच केले. त्यापाठोपाठ माईक स्मिथ, जॉन स्नो, हटन, एंड्रीच व बॉयकॉट यांनी 'मम' म्हणून त्याला साद दिली. या खेळाडूंचा नकार बघून भारतात टीकेचे मोहोळ उठले. या या खेळाडूंव्यतिरीक्त असणारा इंग्लंडचा संघ दुय्यम असणार, भारताला तुच्छ समजून हे खेळाडू दौऱ्यावर येत नाहीत, तेव्हा भारतानेही आपला दुय्यम संघच उतरवावा इथपासून ते भारताने हा दौराच रद्द करावा इथपर्यंत अनेक मागण्या काही समीक्षकांनी केल्या. जरा डोळसपणे पाहिल्यास या मागण्या कशा 'बालीश' आहेत हे कळून येते.

दौऱ्याला नकार देणाऱ्या खेळूंची कामगिरी बघू या. प्रथम कर्णधार इलींगवर्थ घेऊ. हा चाळीसीच्या घरात पोचलेला खेळाडू. सातत्याने कधीच चमकत नाही. मागील वर्षी भारताविरुद्ध याने ३३, २०, १०७, ११ आणि ४ अशा धावा केल्या तर ११८ षट्कात ७ बळी घेतले.

नंतर माईक स्मिथ. मागे भारताच्या दौऱ्यावर कप्तान म्हणून हा आला होता. तेव्हाचा त्याचा 'रडचा' खेळ आपण बघितला आहे. मागील वर्षी भारताविरुद्ध निवड झाली नव्हती. रीचर्ड हटनने भारताविरुद्ध २०, ०, १५, ८१ व १३ अशा धावा केल्या, आणि ६० षट्कात ४ बळी घेतले. यंदा ऑस्ट्रेलियाविरुद्ध याची निवड झाली नाही. तेव्हा स्मिथ व हटन या दोघांचीही भारताच्या दौऱ्यासाठी निवड झाली नसतीच. पण आधीच नकार देऊन त्यांनी 'झाकली मूठ' ठेवली एवढेच !

एड्रीचही आता उतरणीला लागला आहे. यंदा ऑस्ट्रेलियाविरुद्ध त्याने विशेष कामगिरी केली नाहीच. भारताविरुद्ध खेळताना बिशनसिंग बेदीने बऱ्याच वेळा त्याचा ' बकरा ' केला होता. एड्रीचने आपल्याविरुद्ध १८, ६२, ०, ५९, ४१ व ० अशा धावा केला.

जॉन स्नोचीही गोलंदाजी आता तितकीशी भेदक राहिली नाही. मागील वर्षी भारताविरुद्ध तो दोन कसोटी सामने खेळला. गावसकरला धडक मारल्यामुळे दुसऱ्या कसोटी सामन्यात याला अर्धचंद्र दिला होता. दोन सामन्यात स्नोने ७४ षट्कात ६ बळी घेतले होते.

रहाता राहिला जिऑफ बॉयकॉट. यंदा जखमी असल्यामुळे ऑट्रेलियाविरुद्ध तो खेळू शकला नाही. भारताविरुद्धही जखमी असल्यामुळे दोन कसोटी सामने चुकले. फक्त एका सामन्यात तो खेळला, व धावा केल्या ३ व ३३. तरीदेखील बॉयकॉट हा निस्संशय श्रेष्ठ खेळाडू आहे. भारतीयांना याच्या खेळाचे आकर्षण जरूर आहे.

तेव्हा एक बॉयकॉट सोडल्यास इतर खेळाडूंचे दौऱ्यावर न येणे ही गोष्ट काही मनावर घेण्यासारखी नाही. यावर काही मंडळी म्हणतात की, भारताला डिवचण्यासाठीच हे खेळाडू दौऱ्यावर येत नाहीत. भारताला सदैव तुच्छ लेखतात. पण ही परिस्थिती यंदा तरी नाही. पूर्वी काही चांगले खेळाडू भारताला दुय्यम समजून दौऱ्यावर येत नसत. त्यात थोडासा तथ्यांशही असे. कारण भारत इंग्लंडला कडवी लढत कधी देऊ शकला नव्हता. पण मागीलवर्षी भारताने वेस्टइंडिज व इंग्लंड यांना त्यांच्या भूमीवरच खडे चारल्यानंतर भारत ही काय शक्ती आहे याची या खेळाडूंना पुरेपूर कल्पना आहे. शिवाय नकार देणारे बहुतेक खेळाडू हे कसोटी क्रिकेटच्या शेवटच्या टप्प्यात पोचले आहेत. तेव्हा भारताबरोबर आणि तेही भारतात कसोटी मालिका खेळणे म्हणजे अपयश आल्यास (–आणि याची बरीच शक्यता आहे !) आपली कारकीर्द आपणहून संपविण्यासारखे आहे, हे ही मंडळी चांगले जाणून आहेत. परवा इंग्लंडला हरविल्यानंतर भारताच्या विजयाचे रहस्य इलींगवर्थने सांगितले, आणि ते म्हणजे ' भारतीय खेळाडू भारतीय प्रेक्षकांसमोर खेळले ! ' म्हणजे इंग्लंडमधल्या भारतीय प्रेक्षकांच्या प्रोत्साहनाच्या जोरावर भारत सामना जिंकू शकतो, तर भारतामध्ये खेळताना काही विचारायलाच नको ! तेव्हा या खेळाडूंच्या नकारामागे भारताबद्दल तुच्छतेची भावना नसून, पराभवाची भीती दडली आहे.

भारताच्या दौऱ्यासाठी निवडलेला ' इंग्लंडचा संघ समतोल असून इंग्लंडमधील सध्याचा सर्वश्रेष्ठ संघ असे त्याचे वर्णन केले जाते. नव्या जुन्यांचा उत्कृष्ठ मिलाफ या संघात दिसून येतो. संघात पुढील खेळाडू आहेत – डेनिस, अॅमीस, ऑरनॉल्ड, बर्केनशॉ, कॉट, गिफोर्ड, फ्लेचर, नॉट, ग्रेग, ख्रिस ओल्ड, पोकॉक, रूप, टेलर,

अंडरवूड आणि बॅरी वूड. कर्णधार म्हणून टोनी लुईसची निवड झाली आहे. यातील चार खेळाडू सोडल्यास सर्वांना कसोटी क्रिकेट अनुभव आहे.

कर्णधारपदी निवड झालेला टोनी लुईस् हा अद्याप एकही कसोटी सामना खेळलेला नाही. तरीदेखील कप्तानपदाचा त्याला भरपूर अनुभव आहे. १९६२ साली केंब्रिज युनिव्हर्सिटीच्या कप्तानपदी याची निवड झाली होती. नंतर १९६७ पासून ग्लॅमोर्गन संघाच्या नेतृत्वाची धुरा तो समर्थपणे सांभाळीत आहे. याच्या नेतृत्वाखाली १९६९ साली ग्लॅमोर्गनने कौंटी चँपियनशिप मिळविली. कप्तानपदाला आवश्यक असणारे त्वरित निर्णय घेणे, सहकाऱ्यांची काळजी घेणे, त्यांच्याशी चर्चा करणे, हे गुण लुईसमध्ये प्रकर्षाने आहेत. शिवाय तो एक चांगला पत्रकार असून टेलिव्हिजनवर समालोचनाचे कामही करतो. त्यामुळे कप्तानाला सहाय्यभूत ठरणारी संभाषणकला त्याला चांगली अवगत आहे. लुईस हा फिरकी व द्रुतगती गोलंदाजी सारख्याच धडाडीने खेळणारा फलंदाज असून, 'गली' पोझीशनमध्ये उत्कृष्ट क्षेत्ररक्षण करतो. थोडक्यात लुईस हा उत्कृष्ट कप्तान असून वाडेकरने भारतीय संघात जे चैतन्य आणले, तसे इंग्लंड संघात तो आणू शकेल.

तर सांगायचा मुद्दा म्हणजे या इंग्लंडच्या संघाला दुय्यम समजू नये. आणि जे कोणी असे समजतात त्यांनी आपला वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर गेलेला संघ डोळ्यासमोर आणावा. चार-पाच खेळाडू सोडल्यास इतरांची नावेही वेस्ट इंडिजमधील लोकांना माहीत नव्हती. सुनील गावसकरसारखे काही खेळाडू कसोटी सामने तर सोडाच, पण प्रथम श्रेणीचेही मोजकेच सामने खळले होते. दौऱ्याआधी वेस्टइंडियन समीक्षकांनी भारतीय संघ हा एखाद्या क्लबच्या लायकीचा आहे असे अनुमान काढले होते. पुढे काय घडले तो इतिहास ताजा आहे!

तेव्हा इंग्लंडचा हा संघ हे एक आव्हान समजून भारताने लढत दिली पाहिजे. मागे मिळविलेल्या विजयावर शिक्कामोर्तब केले पाहिजे, एकदा सामना जिंकून नव्हे तर सणसणीतपणे पाचही सामने जिंकून!

– आणि हे तितकेसे सोपे नसले तरी अवघड खासच नाही!

 पृष्ठ ८ वरून

होती. मिरवणुकीने आक्रमिलेला लांबचा मार्ग व विद्यार्थ्यांचा अतिउत्साह यामुळे मिरवणूक शनवारवाड्यावर साडेबारा वाजता पोचली. त्यामुळे ध्वजारोहणासाठी आयोजित केलेला बारा वाजून एक मिनिट हा ऐतिहासिक क्षण निसटला. अखेर परिषदेचे अध्यक्ष द. मा. मिरासदार यांना विद्यार्थ्यांना प्रसंगाच्या गांभीर्याची जाणीव करून द्यावी लागली. नंतर हजारो विद्यार्थी व इतरेजनांच्या साक्षीने ध्वजारोहण झाले. ☐

## मला जागा द्या

१५ ऑगस्ट रोजी दरवर्षीप्रमाणेच ध्वजवंदन, संचलन वगैरे कार्यक्रम झाले. पण विशेष नजरेत भरणारा कार्यक्रम झाला तो स्वातंत्र्यसैनिकांच्या सत्काराचा! पुणे शहर-जिल्हा काँग्रेसतर्फे झालेल्या या समारंभात पाटबंधारे मंत्री ना. वसंतराव-दादा पाटील यांनी स्वातंत्र्यसैनिकांना आवाहन केले, "स्वातंत्र्यसैनिकांचे काम अजून संपले नाही. देशात संपत्ती वाढत आहे. पण ती विशिष्ट वर्गाच्याच हातात आहे. या संपत्तीचे वाटप सर्व थरात करण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी पुन्हा कामाला लागावे." पण या आवाहनाला प्रतिसाद देण्यासारखी स्वातंत्र्यसैनिकांची परिस्थिती आहे का? पुढील प्रसंग फार बोलका आहे – ना. वसंतरावदादा प्रत्येक स्वातंत्र्य सैनिकाच्या शर्टला रौप्यपदक लावत होते. वासुदेवराव साठ्ये नावाच्या एका अपंग स्वातंत्र्य सैनिकाजवळ जेव्हा ते आले तेव्हा क्षणभर भांबावले. कारण साठ्यांच्या अंगात शर्ट नव्हता. केवळ एक पंचा गुंडाळूनच ते आले होते. याप्रसंगी साठ्यांनी केलेले भाषण हृदय पिळवटून टाकणारे होते. ते म्हणाले, 'आज मी पूर्णपणे कफल्लक आहे. मला रहायला जागा नाही. कुणाच्या मदतीचा हात नाही. त्यातून मी पांगळा. नाहीतर स्थानबद्ध होण्यासाठी लागणारी कुठलीतरी कृत्ये करून मी आपणहून स्थानबद्ध झालो असतो. निदान तुरुंगात मला रहायला जागा तरी मिळाली असती. पण तेही मला आज करता येत नाही.' देशातील अनेक प्रामाणिक आणि भोळ्या स्वातंत्र्यवीरांचा कमीअधिक प्रमाणात हीच अवस्था आहे. मानाने मिळायला हव्यात अशा गोष्टींसाठी या लोकांना अर्ज, विनवण्या कराव्या लागतात, क्वचितप्रसंगी भीकही मागावी लागते. ☐

## इंडियन सेक्युलर सोसायटी!

रौप्यमहोत्सवाच्या समारंभातील वैचारीक पातळी सांभाळण्याचे काम इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लीम सत्यशोधक समाज यांनी केले. 'धर्मनिरपेक्षतेची

पंचवीस वर्षे' या विषयावर त्यांनी परिसंवाद आयोजित केला होता. केवळ वर्तमानपत्री लिखाण किंवा मर्यादित क्षेत्रात चर्चा करणारी ही मंडळी स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने 'जनते'त आली ही आनंदाची गोष्ट! सामान्य जनास या विषयाची असलेली 'आवड' लक्षात घेऊन संयोजकांनी गोखले अर्थशास्त्र संस्थेतील छोटयाश्या सभागृहात परिसंवादाची व्यवस्था केली होती. पण त्यांचा अपेक्षाभंग झाला, अर्थात चांगल्या अर्थाने! लोकांनी इतकी गर्दी केली की सभागृहातील खुर्च्या केव्हाच भरल्या, सभागृहही खच्चून भरले, इतकेच नव्हे तर बाहेरही अनेक उत्सुक चेहरे दाटीवाटीने उभे होते. प्रा. अ. भि. शहा, प्राचार्य दाभोळकर, हमीद दलवाई यांनी भाषणे केल्यानंतर बाबा आढाव, गं. बा. सरदार, दि. के. बेडेकर, 'माणूस'चे श्री. ग. माजगावर यांनी आपले विचार मांडले. हमीद दलवाईंनी 'मुस्लीम समाज व धर्मनिरपेक्षता या विषयावर बोलताना मुस्लीमांच्या कडव्या धर्मवादाबद्दल सांगितले. 'हिंदू राज्याचे पुरस्कर्ते हे मुसलमान होते' असे धाडसी विधानही त्यांनी केले. मुसलमानांचे असे म्हणणे होते की हिंदूंनी राज्य करावे, ते त्यांना जमले नाही तर इतरांनी करावे, पण समानता वगैरे नको! यावर त्यांनी जीनांचे उदाहरण दिले. जीना म्हणत की, मी सावरकरांशी अवश्य बोलीन, कारण ते हिंदूंचे प्रतिनिधी आहेत. पण गांधींशी मी मुळीच चर्चा करणार नाही. कारण ते समानतेचे पुरस्कर्ते आहेत. आणि इस्लामला समानता अमान्य! दलवाईंनी नंतर जिथे जिथे मुस्लीम अल्पसंख्य आहेत तिथे तिथे त्यांचा राज्यव्यवस्थेबरोबर संघर्ष चालतो हे दाखवून दिले व शेवटी सार काढले की, 'इस्लाममध्ये बदलाची मूलभूत प्रकीया झाली नाही.' प्रा. बेडेकरांनी या प्रश्नाची आर्थिक परीस्थितीशी सांगड घातली. 'मुस्लिमांचा प्रश्न हा चार दिवसांचा नसून त्या समाजाच्या दारिद्र्याचा आहे. याची सोडवणूक हिंदूंच्या दारिद्र्याशी करता येईल.' शेवटी दादासाहेब रूपवते यांचे समारोपाचे भाषण झाले. त्यांनीं मुख्यत: दलितांच्या प्रश्नावर भर दिला. बावडा येथे झालेल्या हरिजनांवरील अत्याचाराबद्दल बोलताना ते म्हणाले, 'बावडयातील अत्याचार मोठ्या प्रमाणावर नजरेसमोर आला. कारण खेडयातील माणसे ही मूळातच रांगडी. पण अशा तऱ्हेचे अत्याचार सर्वत्र चालू आहेत. नूतन मराठी हायस्कूल किंवा किंग जॉर्ज हायस्कूल येथे शिपायापासून मुख्याध्यापकापर्यंत एकही दलीत समाजातील दिसत नाही हा अत्याचारच आहे.' शेवटी त्यांनी जे सांगितले त्यात मात्र सामान्य जनांचे प्रतिबिंब पडले होते. ते म्हणाले, 'धर्मनिरपेक्षतेचे हे आंदोलन व्यापक स्वरूपात झाले पाहिजे. या मंडळींनी आता खोलीतून बाहेर पडून व्यासपीठावर यावे. तसेच नुसत्या मुस्लीम समाजाबद्दल नव्हे तर एकूण भारतीय समाजाबद्दल विचार झाला पाहिजे.' —आणि हे बरोबर आहे. इंडियन सेक्यूलर सोसायटी सध्या केवळ हिंदू-मुस्लीम प्रश्नांवरच जास्त चर्चा करते. याचबरोबर त्यांनी दलितांवरील अत्याचारा-

कडेही अधिक लक्ष पुरविले पाहिजे आणि तेही नुसत्या चर्चेतून नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीने ! ◻

## युद्धभूमीचा आभास

इतरांनी हेवा करावा असा एक दुर्मिळ आनंद पुणेकरांना या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने मिळाला. इ. आर. डी. एल. (एक्स्प्लोझिव रिसर्च डेव्हलपमेंट लॅबोरेटरी) व ए. आर. डी. इ. (आरमामेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट) यांच्या विद्यमाने आधुनिक शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन व दारूगोळ्याचे प्रात्यक्षिक आयोजित केले होते. भारतीय संरक्षण व्यवस्थेत या दोन संस्था मोलाचे कार्य करीत आहेत. वास्तविक या संस्थांचे संशोधनकार्य हे 'अत्यंत गुप्त' या सदरात मोडते. तरी देखील त्यांनी ते मर्यादित प्रमाणात उघड करून पुणेकरांना अनोखा नजराणा सादर केला. पाषाणच्या इ. आर. डी. एल. च्या दर्शनी दालनात हे प्रदर्शन भरले होते. यात मशिनगन्स, उखळी तोफा, रॉकेटस् इ. आधुनिक शस्त्रे होती. शिवाय या प्रत्येकाला लागणारी स्फोटक द्रव्येही मांडली होती. स्वयंसेवक माहिती सांगत होते. अर्थात काही जिज्ञासू लोकच ही माहिती ऐकत होते. बाकीचे केवळ दर्शन घेऊन पुढे पुढे सरकत होते. त्यांचे लक्ष होते दारूगोळ्याच्या प्रात्यक्षिकाकडे ! दुपारी तीन वाजता या प्रात्यक्षिकांना सुरुवात झाली. इमारतीच्या मागे असलेल्या टेकडीवर प्रेक्षक बसले होते व खालच्या विस्तीर्ण जागेत ही प्रात्यक्षिके चालली होती. प्रत्येक प्रात्यक्षिकाआधी इंग्रजी व मराठीतून माहिती सांगण्यात येत होती. कठीण जागेतून रणगाड्याच्या सफाईदार हालचाली, शत्रूला आपल्या हालचाली दिसू नये म्हणून बाँबचा स्फोट करून धुराच्या भिंती निर्माण करणे बघायला मिळाले. नंतर विमान किंवा जहाज संकटात सापडले तर रंगीत धूर उत्पन्न करून संदेश पाठविणे किंवा विमानांना आपले 'लक्ष' अचूक टिपण्यासाठी शत्रूच्या ठिकाणाजवळ तांबडा व नारींगी धूर उत्पन्न करणारे बाँबस् यांचे प्रात्यक्षिक झाले. संकटकाळी वैमानिकाने केवळ एक बटन दाबताच खुर्चीसकट तो बाहेर फेकला जाऊन अलगद उतरणे, सुरुंगाचे स्फोट, बंकर्समध्ये लपलेल्या शत्रूवर अग्नीअस्त्राचा मारा, ध्वनीपेक्षा जास्त वेगाने जाणारी रॉकेटस् अशा आश्चर्यकारक गोष्टी पहावयास मिळाल्या. शेवटी 'चार्ज लाईन माईन क्लीअरिंग'चे अफलातून प्रात्यक्षिक झाले. शत्रूने पेरलेल्या सुरुंगावरून एक रॉकेट फेकले जाते. हे रॉकेट जात असताना आपल्यामागून दोरखंडासारखा अवयव फेकते. नंतर शंभर दिडशे फूट सरळ रेषेत प्रचंड स्फोट होऊन शत्रूचे सुरुंग नष्ट केले जातात.

अशा तऱ्हेने कधीही बघायला मिळणार नाहीत अशा युद्धातील करामती बघायला मिळाल्या. युद्धात काय चालते आणि ते कसे भयानक असते या विचारात लोक परतत असताना त्या जागेला एखाद्या युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त झाले होते ! ◻ ◻




# श्रीदेव नारायणमहाराज

**ब. मो. पुरंदरे**

पुण्याच्या वायव्येला चिंचवड म्हणून एक गाव आहे. पावना नदीच्या किनाऱ्यावर चिंचवड वसलं आहे. मोरया गोसावी या नावाचे एक फार थोर योगी होऊन गेले. ते गणपतीचे महान् भक्त होते. तुकाराम महाराज, समर्थ रामदास स्वामी आणि मोरया गोसावी हे एकाच कालातले. मोरया गोसावींनी पवनेच्या काठावर जिवंत समाधी घेतली. यांचे पुत्र चिंतामणी महाराज देव हेही थोर गणपतीभक्त होते. त्यांचीही समाधी चिंचवडला मोरया गोसावींच्या समाधीच्या पूर्वेला जरा खोल भूभागी आहे. या चिंतामणीमहाराजांचे पुत्र नारायणमहाराज देव यांचीही गणेशभक्ती जाज्वल्य होती. म्हणजे चिंचवड हे तीन पिढ्यांचे भक्तिपीठ बनले होते. साक्षात्कारी महायोग्यांच्या समाध्या आणि प्रत्यक्ष तपोसाधना करताना मोरया गोसावींना मिळालेली श्रीमंगलमूर्ती गणेशाची सुंदर मूर्ती इथेच चिंचवडात होती. नारायणमहाराज देवांशी अनेक सरदार मनसबदारांचा प्रेमादराचा संबंध होता.

आदिलशाहीचे आणि मुघलशाहीचे सुभेदार दरखदारही नारायणमहाराजांशी आदराने वागत. प्रत्यक्ष शिवाजीमहाराज तर त्यांना अपार भक्तिभावाने आदरीत. नारायणमहाराजांचाही त्यांच्यावर मोठा अनुग्रह होता. या सर्वच गोष्टीमुळे चिंचवड हे एक फार मोठं तीर्थक्षेत्र आणि यात्रास्थान बनलं होतं. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात वद्य चतुर्थी, पंचमी आणि षष्ठी या तीन दिवशी चिंचवडला प्रचंड यात्रा भरायची. हा असायचा श्रीमोरया गोसावींच्या पुण्यतिथीचा सोहाळा. हजारो लोकांना भोजन मिळायचं. शिवाय दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीस असा महाप्रसाद असायचाच. हा मोठा आनद सोहाळा असायचा. यासाठी धान्य, तूप, गूळ, मीठ, नारळ वगैरे सर्वच सामग्रीची गरज असायची. आदिलशाहीतील सुभेदारांनी व सरदारांनी पूर्वीपासूनच या खर्चाची तरतूद करून दिलेली होती.

या तरतुदीत एक तरतूद अशी होती की, कोकणातील पेण, पनवेल, नागोठणे वगैरे भागातून तांदूळ, मीठ, नारळ वगैरे कोकणी सामग्री शेतकऱ्यांकडून व व्यापाऱ्यांकडून पडत्या भावाने खरेदी करण्याचा 'हक्क' श्रीदेव चिंचवडकरांना सनदेने मिळाला होता. याचा अर्थ असा की, या मालाचा भाव बाजारात कितीही असो; देवांना मात्र हा माल अगदी नाममात्र किंमतीला मिळत असे. नव्हे, असा माल मिळविण्याचा सनदेने हक्कच प्राप्त झाला होता देव चिंचवडकरांना. अन् मग असंख्य पोती भरभरून हा माल 'पडत्या भावाने' खरेदी करून चिंचवडास आणण्यात येत असे. हे काम चिंचवडकरांचे कारकून करीत असत. खरेदी केलेला माल बैलांवर लादला जायचा व हे बैल कोकणातून घाट चढून देशावर चिंचवडास येत.

पुढे स्वराज्याची सरहद्द समुद्राला भिडली. स्वराज्याचे नियम आणि कायदे सर्वांना सारखे असत. महाराजांचे अंमलदार नेमले गेले होते. रयतेचे आणि एकूणच शेतकऱ्यांचे नुकसान करणारे कायदे व वतने जी पूर्वी होती, ती महाराजांनी सक्तीने बंद करून टाकली. प्रश्न होता आता चिंचवडकरांना मिळणाऱ्या पडत्या भावाचा. या अशा 'पडत्या' भावामुळे ज्यांचा ज्यांचा माल खरेदी केला जायचा, त्या त्या मालमालकांचे अतिशय नुकसान व्हायचे. ही गोष्ट स्वराज्याच्या रिवाजात बसणारी नव्हती. देव चिंचवडकर हा माल काही स्वतःच्या संसारासाठी नेत नसत. ते नेत असत देवाधर्मासाठी, जनतेला अन्नसंतर्पण करण्यासाठीच. पण तरीही किंमत अत्यंत कमी मिळत असल्यामुळे मालाच्या मालकांचं नुकसान काही चुकत नव्हतं. हे नुकसान दरवर्षीच सतत व्हायचं! चिमूटभर पैशाला कणगीभर माल जायचा!

दरवर्षीप्रमाणे देव चिंचवडकरांचे कारकून माल खरेदी करायला कोकणात उतरले. कारकून, नोकरचाकर आणि बैलांचा तांडा आला. स्वराज्याचे अधिकारी चौक्यापहाऱ्यावर होते. त्यांनी ही वरात अडविली. चिंचवडच्या कारकुनांनी पुसलं,

'आम्हास काय म्हणून अडविता ? आम्ही श्रीमन् नारायणमहाराज देव

चिंचवडकर यांची माणसे. परंपरेप्रमाणे माल खरेदीसाठी आलो.'

'तुम्हाला हा माल पडत्या भावाने खरेदी करता येणार नाही. जो इथं बाजारभाव असेल, त्याच भावाने खरेदी करावा लागेल.'

'व्वा ! हा माल आम्ही पडत्या भावाने वर्षानुवर्ष खरीद करतो आहोत. बादशाही राज्य होतं तरी त्यांनाही आडकाठी केली नाही. उलट श्रीनारायणमहाराजांना अधिकाराच्या सनदा दिल्या.'

'ते बादशाही राज्य होतं. हे स्वराज्य आहे.'

'व्वा ! म्हणजे मुसुलमानी राज्यात श्रीमोरयाच्या उत्सवाला तशी मदत होते आणि हे शिवाजीराजांचं राज्य असूनही या देवकार्याला विरोध? व्वा ! काय न्याय आहे ! काय धर्मपालन आहे !'

'होय, स्वराज्यात असाच न्याय आहे, हेच धर्मपालन आहे. या तुमच्या पडत्या भावाच्या खरेदीमुळे गरीब शेतकऱ्यांचं नुकसान होतं.'

'अहो पण हा सारा माल आम्ही नेतो, तो काही आमच्या घरच्या लग्नामुंजीसाठी नेत नाही. श्रीच्या उत्सवासाठी, अन्नसंतर्पणासाठीच नेतो ना ?'

'असेल ! पण तरीही शेतकऱ्यांचं नुकसान होतंच ना ? हे नुकसान शिवाजीमहाराजांस मजूर नाही. तुम्ही शिवाजी महाराजांकडून आम्हाला आज्ञापत्र आणवून द्या. मग तुम्हास पडत्या भावाने माल खरेदी करू देऊ. तोपर्यंत नाही !'

'अहो पण, तुमचे शिवाजीराजे आमच्या श्रीदेव महाराजांचे परम भक्त आहे. ते अशा देवकार्यासाठी चालू असलेल्या श्रीच्या हक्कावर बंदी कशी घालतील ? सांगा !'

'आम्ही महाराजांची आज्ञाच पाळतो आहोत. आपण महाराजांकडून नवीन आज्ञापत्र आणा. आम्ही त्याप्रमाणे वागू.'

'तुमच्या बळजोरीपुढे उपाय काय ! शेवटी तेच करावे लागणार. आम्ही लिहितो महाराजांना चिंचवडास.'

त्या कारकुनांनी हा सारा प्रकार चिंचवडास श्रीदेव नारायणमहाराजांस कळविला. श्रीदेव महाराजांस आश्चर्यच वाटलं. त्यांनी ताबडतोब माणसं राजगडावर शिवाजीमहाराजांकडे पाठविली आणि विनंती केली की, कोकणाहून पूर्वापार रिवाजाप्रमाणे पडत्या भावाने माल खरेदी करण्यास मोकळीक द्या.

श्रीदेवांची माणसं पत्र घेऊन राजगडावर आली. शिवाजीमहाराजांनी श्रीदेवमहाराजांचं पत्र आपल्या मस्तकी लावलं. कारण ते पत्र एका थोर ईश्वरभक्ताचं होतं नंतर पंतांनी ते पत्र वाचून दाखविलं. सारा प्रकार महाराजांच्या लक्षात आला. एका बाजूला, धार्मिक काम आणि अन्नदान यासाठी ही खरेदी होत आहे, तर दुसऱ्या बाजूला या अशा खरेदीमुळे शेतकऱ्यांना अत्यंत कमी किंमत मिळतेय अन् वर्षानुवर्ष हा नुकसानीचा फटका सहन करावा लागतोय हे महाराजांना

दिसलं. आता यावर उपाय काय ? हुकूम काय द्यायचा ?

महाराच क्षणभरच थांबले. ते लगेच पंतांना म्हणाले,

' पंत, श्रीदेव नारायणमहाराजांना सरकारी आज्ञापत्र पाठवा की, पडत्या भावाने माल खरेदी करण्याचा आपला हक्क जप्त करण्यात आला आहे. येथून पुढं अशा पद्धतीने आपणांस माल खरेदी करण्यास बंदी करण्यात येत आहे !'

मोरोपंत चकित होऊन महाराजांकडे बघतच राहिले. ते काही बोलणार एवढ्यांत महाराज म्हणाले,

' होय पंत, बंदी ! गरीब शेतकऱ्यांचं नुकसान करून धर्मकार्य करणं म्हणजे अधर्मच. हे आज्ञापत्र देवमहाराजांना सादर करा. '

बंदीचं आज्ञापत्र चिंचवडला श्रीदेवांना सादर झालं शिवाजीराजांकडून हे असलं पत्र येईल अशी श्रीदेवांना वा कोणालाच कल्पनाही नव्हती. श्रीदेवांनी विस्फारलेल्या नजरेने पत्रातील मजकूर वाचला. त्यांनी लगेच म्हटलं,

' हा राजा वेगळाच आहे. आपल्याला लागणारा माल बाजारभावाने खरेदी करा. '

तेवढ्यांत दुसऱ्याच दिवशी राजगडाहून महाराजांचं श्रीदेव महाराजांना विनंतीपत्र आलं. महाराजांनी अत्यंत लीनतेने, जिव्हाळ्याने व प्रेमादराने श्रीदेवमहाराजांना लिहिलं होतं की, श्रीच्या उत्सवासाठी व अन्नसंतर्पणासाठी आपणांस जो जो माल, जितका लागेल तितका, स्वराज्याच्या सरकारी अंबरीतून विनामूल्य चिंचवडास घरपोच होईल. चिंता करू नये. कसलीही उणीव पडणार नाही.

बहुत काय लिहिणे ? आशीर्वाद असो द्यावा विज्ञापना, मर्यादेय विराजते !



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd No. MH 649

# बर्वे-पायगुडे निधी

अनिल बर्वे वकाशिनाथ पायगुडे हे दोघेजण नक्षलवादी पत्रके छापल्याच्या आरोपावरुन गेले वर्ष-सव्वा वर्ष (एक महिना वगळता) येरवड्याच्या तुरुंगात डांबले गेलेले आहेत, हे आता सर्वांना माहीतच आहे. त्यांच्यावर नुकतेच आरोपपत्र दाखल झाले असून खटल्याचे रीतसर कामकाज चालू महिना अखेर पुणे येथील न्यायालयात सुरु होत आहे. कागदपत्रे, वकील फी, प्रवास इत्यादी सर्व मिळून सुमारे दोन ते तीन हजार रुपये तरी याकामी खर्च येईल असा अंदाज आहे. आत्तापर्यंत चार-पाचशे रुपयांचा खर्च होऊनही गेलेला आहे. ज्या मित्रांना बर्वे-पायगुडे यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांच्यावर विनाकारण शिक्षा भोगत राहण्याची पाळी येऊ नये असे वाटते त्यांनी यावेळी पुढे येऊन खर्चाचा भार यथाशक्ती उचलणे अवश्य आहे. रक्कम लवकर मनिऑर्डरने पाठवावी किंवा खालील पत्त्यावर पोचती करावी. सर्व हिशोब शेवटी ‘ माणूस ’मधून प्रसिद्ध होईल.

संपादक माणूस

बर्वे–पायगुडे समिती
माणूस साप्ताहिक । १०२५ सदाशिव पेठ । पुणे ३०